रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २९३
www.ramprahar.com
रविवार, ११ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

# शस्त्रसंधीचे उल्लंघन

## युद्धविरामानंतरही पाकिस्तानकडून भारतावर हल्ले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मागील तीन-चार दिवसांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला होता. अखेर दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करण्यासाठी तयार दर्शवली आहे. याबाबत भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी शनिवारी (दि. १०) पत्रकार परिषद घेत माहिती दिली. दरम्यान, युद्धविरामानंतर काही वेळाने पाकिस्ताने शस्त्रसंधीचे उल्लंघन करीत भारतावर हल्ले केले.



जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला होता. दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारताने पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या नियंत्रणात असलेल्या काश्मीर (पीओके)मधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. यानंतर पाकिस्तानकडून आंतरराष्ट्रीय सीमेवर वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात होते. भारतातील अनेक ठिकाणी पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला, ज्याला भारतीय लष्कराने वेळोवेळी सडेतोड प्रत्युत्तर दिले. यादरम्यान शनिवारी भारत आणि पाकिस्तान यांच्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये फोनवरून चर्चा झाली आणि दोन्ही देशांचे शस्त्रविरामाच्या मुद्द्यावर एकमत झाल्याचे पहायला मिळाले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक्सवर घोषणा करताना म्हटले की, अमेरिकेच्या मध्यस्थीने रात्री उशिरापर्यंत चाललेल्या चर्चेनंतर अखेर मला ही घोषणा करताना आनंद होत आहे की, भारत आणि पाकिस्तान हे दोघेही पूर्णपणे आणि तत्काळ शस्त्रसंधी करण्यास तयार झाले आहेत. सारासार विचार आणि विद्वत्तेचा वापर केल्याबद्दल दोन्ही देशांचे अभिनंदन!

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी याबद्दल प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, पाकिस्तानचे लष्करी मोहीम महासंचालक आणि भारताचे लष्करी मोहीम संचालक यांच्यात आज दुपारी ३.३५ मिनिटांनी चर्चा झाली. दोन्ही देशांकडून जमिनीवरून, हवेतून आणि समुद्रातून होणार हल्ले भारतीय प्रमाणवेळेनुसार ५ वाजेपासून तत्काळ थांबवण्यावर एकमत झाले. याची अंमलबजावणी करण्याचे दोन्ही बाजूंना सांगण्यात आले आहे. दोन्ही देशांचे डीजीएमओ यांच्यात १२ मे रोजी पुन्हा दुपारी १२ वाजता चर्चा होणार आहे.

दरम्यान, पाकिस्तानने रात्री शस्त्रसंधीचे उल्लंघन करून भारतावर ड्रोनद्वारे हल्ले केले.



उलवे नोड : शेकापचे ज्येष्ठ नेते तथा पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे व समर्थकांनी शनिवारी भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा भाजप रायगड जिल्हा संपर्क मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, सुरेश लाड, जि.प.चे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील आदी उपस्थित होते. (वृत्त उद्याच्या अंकात)

# यापुढे कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल | भारताचा पाकिस्तानला इशारा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत-पाकिस्तान वाढत्या तणावादरम्यान भारताने मोठा निर्णय घेतला. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल तसेच त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. याबाबतची माहिती सुत्रांनी दिली.

पाकिस्तानने शनिवारी (दि. १०) शस्त्रसंधी होण्यापूर्वी पहाटेच्या वेळी भारताच्या पश्चिम सीमेला लक्ष्य केले. त्यांनी भारताच्या लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, युद्धसामग्री आणि लढाऊ विमानांचा वापर केला. भारताने त्याला चोख प्रत्युत्तर देत त्याचे सर्व हल्ले यशस्वीरित्या परतवून लावले. दरम्यान, या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पश्चिम सीमेवरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.



या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

गेल्या काही वर्षांपासून सातत्याने होत असलेल्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी कारवाया भारताच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरल्या आहेत. अलिकडेच २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे हल्ला करून २६ पर्यटकांची हत्या केली होती. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर यापुढे भारताच्या भूमीवरही कुठलाही दहशतवादी हल्ला भारताविरोधातील युद्धाची कारवाई मानली जाईल तसेच त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर दिले जाईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला असल्याची माहिती वरिष्ठ सुत्रांनी दिली.

## पाषाणे डॅममध्ये चार तरुण बुडाले; तिघांना वाचवण्यात यश, एक बेपत्ता

**नेरळ : प्रतिनिधी**

पाषाणे डॅममध्ये चार तरुण बुडाले असून यामध्ये तीन जणांना वाचवण्यात यश आले, तर २६ वर्षीय अजय रावत हा तरुण बेपत्ता आहे. या तरुणाचा रात्री उशिरापर्यंत स्थानिकांच्या मदतीने नेरळ पोलीस शोध घेत होते, परंतु अंधार झाल्याने शोधमोहीम थांबवण्यात आली असून सकाळी खोपोली येथील बचाव पथकाची मदत घेण्यात येणार आहे.

नवी मुंबईतील दिघा गाव येथील रोजकुमार सोनपाल छाजलाना, हरेंदर सोहन सिंग, दीपक रोजकुमार छाजलाना, आदित्य रोजकुमार छाजलाना आणि अजय रावत हे पाच तरुण वांगणी पाषाणे येथील हिमालय गार्डन येथे मित्राकडे फिरण्यासाठी आले होते. गावाला लागून असणाऱ्या खडकवाडी येथील पाषाणे डॅम येथे हे तरुण पोहण्यासाठी गेले असता दुर्घटना घडली.

## सुटकेसमध्ये आढळलेल्या मृतदेहाचे गूढ उकलले

### कर्जत, नेरळ पोलिसांकडून दोन आरोपींना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ठाकूरवाडी रेल्वेस्थानकाजवळ १६ एप्रिल रोजी गुलाबी रंगाच्या ट्रॉली बॅगमध्ये एका तरुणीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती. नेरळ आणि कर्जत पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावत आरोपींना अटक केली आहे. धनलक्ष्मी एराप्पा रेड्डी ऊर्फ बिंदू (वय ३४, रा. रापताडू, आंध्र प्रदेश) असे मृत तरुणीचे नाव असून आरोपी हे उच्चशिक्षित आहेत.

तपासादरम्यान पोलिसांनी मुंबईहून दक्षिण भारतात जाणाऱ्या मेल गाड्यांचे सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले. यात लोकमान्य टिळक टर्मिनस येथून निघालेल्या मुंबई-कोइंबतूर एक्स्प्रेसमध्ये एक संशयित जोडपे गुलाबी बॅग घेऊन जाताना दिसले. त्यांनी कोणत्या डब्यात प्रवास केला याची शहानिशा करीत बंगळुरू स्टेशनवर बॅग नसलेल्या अवस्थेतील त्या जोडप्याचे दृश्य पोलिसांच्या हाती लागले.

बुकिंग तिकीटावरील फोन नंबर आणि लोकेशनच्या आधारे नेरळ पोलिसांनी बंगळुरू येथील एका लॉजवर धाड टाकून आरोपी व्ही. विजयकुमार व्यंकटेश (वय २६, रा. चित्तूर, आंध्र प्रदेश) आणि टी यशस्विनी राजा (वय २४, रा. तिरुपती, आंध्र प्रदेश) या दोघांना ताब्यात घेतले.

दोघा आरोपींनी धनलक्ष्मी ऊर्फ बिंदू या तरुणीचा खून करून तिचा मृतदेह सुटकेसमध्ये भरून रेल्वे ट्रॅकजवळ टाकल्याचे उघड झाले. हे तिघेही मूळचे आंध्र प्रदेशातील असून सध्या मुंबई आणि बंगळुरू येथे नोकरीच्या शोधात होते. आरोपींना १६ मेपर्यंत सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. **(संबंधित वृत्त पान ७ वर..)**

## पेणमध्ये तरुणाची देशविरोधी पोस्ट, गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये एका तरुणाने देशविरोधी चिथावणीखोर पोस्ट केली. त्यामुळे त्याचा शहरातील सर्वधर्मीय नागरिकांनी निषेध व्यक्त केला. या प्रकरणाची पेण पोलिसांनी दखल घेतली असून तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पेण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ३ एप्रिल रोजी फिर्यादी आयुष शाह यांच्या सोशल मीडिया इन्स्टाग्राम ॲपवरील आयडीवर आरोपी मोसिन मुजावर याने त्याच्या आयडीवरून भारताविरुद्ध चिथावणी देणारी पोस्ट केली. त्याने इतरांनादेखील हा मेसेज प्रसारित करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भारत-पाकिस्तान या दोन देशात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असताना मोसिन मुजावरचे प्रकरण अधिकच तापले. पेणमध्ये सर्वधर्मीय नागरिक व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत निषेध नोंदवत आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली.

पोलिसांनी आरोपी मोसिन मुजावरविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३५३,१ ख व ३५३ (२) गुन्हा दाखल केला असून तातडीने प्रभारी निरीक्षक ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली व निरीक्षक संदीप बागुल यांच्या सूचनेनुसार एक पथक आरोपीला पकडण्यासाठी मुंबईकडे रवाना झाला आहे.

## रायगडात धरणांनी गाठला तळ

### सात तालुक्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर

**अत्यल्प साठा असलेली धरणे**
कोतुर्डे (महाड) व ढोकशेत (सुधागड) ५ टक्के, रानिवली (श्रीवर्धन) ७ टक्के, उन्हेरे (सुधागड) ८ टक्के, मोर्बे (पनवेल) ९ टक्के, श्रीगाव (अलिबाग) ११ टक्के, घोटवडे (सुधागड) १३ टक्के.

**अलिबाग : प्रतिनिधी**

उन्हाची वाढती तीव्रता तसेच पिण्यासाठी आणि सिंचनासाठी होणाऱ्या पाण्याच्या वापरामुळे रायगड जिल्ह्यातील धरणांमध्ये केवळ २९ टक्केच पाणी शिल्लक राहिला आहे. पाटबंधारे विभागाच्या २८ धरणांपैकी सात धरणांनी तळ गाठल्याने पाणी समस्या गंभीर बनली आहे.

जुलैमध्ये पडणाऱ्या मुसळधार पावसात बहुसंख्य धरणे तुडुंब भरतात, तर काही ओसंडून वाहू लागतात. दुसरीकडे एप्रिल व मेमध्ये मात्र तीव्र उन्हाळा व पाण्याची मागणी वाढल्याने धरणातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस घटते. काही धरणांतील पाण्याचा वापर सिंचनासाठीही केला जातो.


रायगड जिल्ह्यामध्ये श्रीवर्धन, पनवेल व खालापूर तालुक्यात तीन धरणे, सुधागड तालुक्यात पाच धरणे, महाडमध्ये चार धरणे, म्हसळा व कर्जत तालुक्यात दोन धरणे आहेत, तर अलिबाग, पेण, मुरूड, तळा, रोहा व उरण तालुक्यात प्रत्येकी एक धरण आहे. या धरणातील पाण्यावर आजूबाजूच्या गावांमधील नळ पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत. त्यांना पाणी कमी पडत आहे.

## कामोठ्यात परेशशेठ ठाकूर केसरी भव्य कुस्ती स्पर्धा

### लाल मातीत रंगणार कुस्तीचा रोमांचक थरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या मातीतून जन्मलेली आणि राज्याच्या परंपरेशी नाळ जुळवणारी कुस्ती केवळ खेळ नसून शौर्य, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. याच परंपरेला पुन्हा उजाळा देत पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते आणि युवकांचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या वतीने मा. श्री.परेशशेठ ठाकूर केसरी भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



स्पर्धा रविवारी (दि. १८) सायंकाळी ४ वाजता कामोठे सेक्टर ६ मधील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानात लाल मातीवर होणार आहे. स्पर्धेतील एकूण पारितोषिकांची रक्कम ११ लाख ११ हजार १११ रुपये इतकी असून नामवंत मल्ल या स्पर्धेत आपल्या ताकदीची चुणूक दाखवणार आहेत.

कुस्ती स्पर्धा फक्त एक खेळ नाही, तर देशाच्या मातीतल्या परंपरेचा, ताकदीचा आणि सन्मानाचा एक उत्सव असतो. कुस्ती लढतीत ताकद, धैर्य आणि कुशलता यांचा सुरेख संगम पहायला मिळतो. त्यामुळे लाल मातीच्या या खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**दिग्गज मल्लांचा सहभाग**

या स्पर्धेत रुस्तम-ए-हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध हिंद केसरी पै. सुखविंदर सिंह, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध पै. रिकार्डो अमेरिका (अमेरिका), डबल महाराष्ट्र केसरी पै. शिवराज राक्षे विरुद्ध हिंद केसरी पै. विक्रांत कुमार तसेच उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत विरुद्ध हिंद केसरी पै. हितेंद्र कुमार या दिग्गज व नामवंत कुस्तीपटूंचे रोमहर्षक सामने होणार आहेत. स्पर्धेची जोरदार तयारी सुरू आहे.



# ‘एमएमआरमध्ये मेट्रोच्या आणखी मार्गिका कार्यान्वित होणार’



**मुंबई : प्रतिनिधी**

‘कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेच्या कामास २०१७ मध्ये सुरुवात करण्यात आली. काम वेगाने सुरू होते. मात्र दरम्यानच्या काळात कारशेडस अन्य काही अडचणी आल्या. त्यामुळे प्रकल्पास विलंब झाला. पण सर्व अडचणींवर मात करून ‘मेट्रो ३’ मार्गिका आता अंतिम टप्प्यात आली आहे. या मार्गिकेतील आरे – बीकेसी टप्पा १ ऑक्टोबर २०२४ मध्ये वाहतूक सेवेत दाखल करण्यात आला. तर या मार्गिकेतील बीकेसी – आचार्य अत्रे चौक असा टप्पा २ अ सेवेत दाखल होत असून ही आनंदाची बाब आहे.

आतापर्यंत मुंबईत ५९ किमीच्या मेट्रो मार्गिका कार्यान्वित असून आज त्यात ९ किमीच्या मार्गिकेची भर पडली आहे. तर येत्या दोन वर्षांत आणखी अतिरिक्त १०० किमी लांबीच्या मेट्रो मार्गिका वाहतूक सेवेत दाखल केल्या जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शुक्रवारी दुपारी १२.३० वाजता बीकेसी – आचार्य अत्रे चौक टप्पा २ अचे फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकथान शिंदे यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. लोकार्पण झाले असले तरी सर्वसामान्यांना मात्र या मार्गिकेवरून शनिवारपासून प्रवास करता येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) ३३७ किमी लांबीच्या मेट्रो प्रकल्पातील ३३.५ किमीच्या मेट्रो प्रकल्पाच्या उभारणीची जबाबदारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडे (एमएमआरसी) आहे. त्यानुसार एमएमआरसीने मागील काही वर्षांपासून या मार्गिकेचे काम सुरू केले असून यापैकी आरे – बीकेसी दरम्यानचा १२.६९ किमीचा टप्पा ऑक्टोबर २०२४ मध्ये वाहतूक सेवेत दाखल झाला. आता शनिवार १० मेपासून बीकेसी – आचार्य अत्रे चौक मेट्रो मार्गिकेचे संचलन सुरू होणार आहे. त्यामुळे शनिवारपासून मुंबईकरांचा आरे – आचार्य अत्रे चौक, वरळी नाका असा थेट भूयारी, अतिजलद आणि गारेगार मेट्रो प्रवास सुरू होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी या मार्गिकेचे शुक्रवारी लोकार्पण केले असले तरी प्रत्यक्ष मार्गिकेचे संचलन करण्याच्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी वेळ लागणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष ही मार्गिका शनिवार, १० मेपासून सर्वसामान्यांसाठी खुली होणार असल्याचे एमएमआरसीकडून सांगण्यात आले.

गिरगावसारख्या परिसराखालून, मिठीनदी खालून भुयारी मेट्रो मार्गिका नेणे ही अत्यंत आव्हानात्मक आणि कठीण बाब होती. मात्र एमएमआरसीने हे आव्हान यशस्वीपणे पेलल्यामुळे मिठी नदीच्या खालून आपल्याला मेट्रोने प्रवास करता येत आहे. हे अभियांत्रिकी कौशल्याचे उत्तम उदाहरण असल्याचे म्हणत त्यांनी एमएमआरसीच्या कामाचे कौतुक केले. आचार्य अत्रे चौक कफ परेड टप्पा २ ब ऑगस्टमध्ये सर्वसामान्यांसाठी खुला केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच मेट्रो ३ ला प्रवाशांचा प्रतिसाद वाढत असून संपूर्ण मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्यास प्रतिसाद प्रचंड वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# सुधागड तालुक्यात मॉक ड्रिल



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पालीतील अष्टविनायक क्षेत्र असलेल्या बल्लाळेश्वर मंदिर परिसरात शनिवारी सकाळी १० ते ११ वाजता अतिरेकी हल्ल्याच्या परिस्थितीचा अनुभव देण्यासाठी मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले. या सरावाच्या माध्यमातून आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था, नागरिकांचे रक्षण आणि जखमींच्या बचावासाठी आवश्यक उपाययोजना याची माहिती देण्यात आली.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने केलेल्या हवाई हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार या सरावाचे आयोजन करण्यात आले. अतिरेकी हल्ल्याच्या वेळी नागरिकांनी कोणती सावधगिरी बाळगावी, आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाने कोणत्या उपाययोजना कराव्यात, याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

सरावादरम्यान पोलिस, अग्निशमन दलाच्या गाड्या आणि रुग्णवाहिका तातडीने दाखल झाल्या. नागरी संरक्षण दल आणि आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांनी तातडीने हालचाली करत जखमी नागरिकांना रुग्णवाहिकेतून रुग्णालयाकडे हलवले.

या मॉक ड्रिलमध्ये पोलिस प्रशासन, महसूल विभाग, वन विभाग,पाली नगरपंचायत, स्थानिक प्रशासन, प्रशासकीय अधिकारी तसेच सामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यामुळे नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत वागण्याच्या उपाययोजना प्रत्यक्षरित्या अनुभवता आल्या, ज्यामुळे भविष्यात अशा घटना घडल्यास प्रभावी प्रतिसाद देता येणार आहे.

या उपक्रमाबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद उमटत असून, सुरक्षेच्या दृष्टीने याचा उपयोग होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# प्रसिद्ध रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रसिध्द रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचे शनिवारी सकाळी साडेआठच्या सुमारास पवई येथील हिरानंदानी रुग्णालयात निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी संध्याकाळी दादर येथील शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगी असा परिवार आहे.

‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’, ‘झुबैदा’, ‘ओमकारा’, ‘मकबूल’, ‘लोकमान्य : एक युगपुरुष’ ते अगदी अलिकडच्या काळात ‘आदिपुरुष’, ‘पन्नियन सेल्वन’ सारख्या चित्रपटांसाठी रंगभूषाकार म्हणून काम पाहिलेले, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते विक्रम गायकवाड गेले काही महिने आजारी होते. करोना काळात त्यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यानंतर त्यांच्या प्रकृतीच्या कुरबुरी वाढत गेल्या. पाच–सहा दिवसांपूर्वी त्यांना अस्वस्थ वाटत असल्याने पवई येथील हिरानंदानी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

चेहऱ्यांचा किमयागार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विक्रम गायकवाड यांना . केवळ रंगांच्या जोरावर एखाद्या व्यक्तीला एका वेगळ्याच रुपात बदलून टाकण्याच्या या किमयेने ते मोहून गेले.

# प्रदूषण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला ९२ हजार रुपयांचा दंड

**नवी मुंबई:** बांधकाम स्थळांवरील प्रदूषणाविरुद्ध स्थानिक रहिवाशांच्या तक्रारींना उत्तर देताना, नवी मुंबई महानगरपालिकेने (एनएमएमसी) कोपर खैरणे येथील एका विकासकावर ९२,००० रुपयांपेक्षा जास्त दंड ठोठावला आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अंतिम केलेल्या मानक कार्यप्रणाली (एसओपी) नुसार, एनएमएमसीने ७ आणि ९ मे रोजी दोन नोटिसा बजावल्या आणि बिल्डरला सहा उल्लंघनांसाठी टिक–मार्किंग केले आणि आदेशाचे पालन दर्शविणारी कागदपत्रे सादर करण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली.

न्यू मुंबई महानगरपालिकेने दोषी बांधकाम व्यावसायिकांवर लादलेल्या सर्वात मोठ्या दंडांपैकी हा एक आहे. यापूर्वी वाशी येथील एका बांधकाम व्यावसायिकावर १.१ लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. गेल्या वर्षी महापालिकेने अशा दंडाद्वारे १.७२ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वसूल केली होती.

‘ह्यूमन चेन’ फोरमच्या कार्यकर्त्या मधु शंकर यांनी कोपर खैरणे येथील सेक्टर–११ येथील बांधकाम स्थळावर घाणेरडी वाहने ये–जा करताना दिसल्याने ही उल्लंघने एनएमएमसी वॉर्ड ऑफिसरकडे आणली आहेत. वाहनांमुळे साचलेला चिखल रस्त्यावर पसरत आहे आणि तो सुकल्यानंतर धुळीत रूपांतरित होईल आणि हवा प्रदूषित करेल, असे तिने निदर्शनास आणून दिले.

मानवी साखळीचे संयोजक बी.एन. कुमार यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर एनएमएमसीला टॅग करून लोकांच्या चिंता व्यक्त केल्या. त्यांनी शहर अभियंता शिरीष अर्दवाड यांनाही सतर्क केले ज्यांनी तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन दिले.कार्यकर्त्यांनी या कारवाईचे कौतुक केले आणि नागरी पथकांनी अधिक सतर्क राहावे असे सुचवले.आम्हाला आनंद आहे की नागरी संस्था प्रतिसाद देत आहे, कुमार म्हणाले आणि मोठ्या प्रमाणात लोकांना सतर्क राहण्याची आणि हवा आणि जल प्रदूषणाच्या समस्या उपस्थित करण्याची विनंती केली.

न्यायालयाचे निकाल आणि दंड असूनही, अनेक बांधकाम स्थळे एसओपीचे उल्लंघन करत आहेत आणि वातावरण प्रदूषित करत आहेत, असे त्यांनी खेद व्यक्त केला. खरं तर वाशीच्या सेक्टर ९ मधील रस्ते आणि गल्ल्या धूळ आणि सिमेंटने भरलेल्या आहेत. साइट मॅनेजर डंपर धुण्यासारख्या मूलभूत गोष्टींचे पालन करत नाहीत, असे त्यांनी खेद व्यक्त केला. ऑक्टोबरच्या उष्णतेमध्ये शहरातील काही भागात हवेचा दर्जा निर्देशांक ४०० पर्यंत वाढला होता, तर जागतिक आरोग्य संघटनेची मर्यादा फक्त ५० आहे, याची आठवण त्यांनी करून दिली.उन्हाळ्यात उष्णता सुरू आहे आणि एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत पावसाळा सुरू होण्यापूर्वी बांधकामांना वेग आल्याने परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे, असे ते म्हणाले.

बिल्डर,त्यांचे कर्मचारी, कामगार शहरात राहतात आणि त्यांना स्वच्छ हवा आणि रस्त्यांचे महत्त्व लक्षात आले पाहिजे, असे कुमार म्हणाले.

# माणगाव आयडॉल २०२५ नृत्य प्रकारात रितिका शिंदे अव्वल



**पाली : प्रतिनिधी**

माणगाव जत्रा महोत्सव २०२५ मध्ये माणगाव आयडॉल २०२५ साठी गीतगायन, नृत्य, आणि अभिनय या प्रकारच्या स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील गायन,नृत्य, आणि अभिनय क्षेत्रातील नामवंत कलाकारांनी सहभाग घेतला होता.या स्पर्धेत गायन या प्रकारासाठी प्रथम क्रमांक प्रथमेश महाडिक (महाड) यानी पटकावला तर द्वितीय क्रमांक रितिका नरेश शिंदे (भार्जे पाली) हिने नृत्य या प्रकारात ,तृतीय क्रमांक राजीव मोरे (माणगाव) अभिनय प्रकारात मिळविला.

या स्पर्धेत उत्तेजनार्थ गायत्री सुतार (महाड )गायन,तर विशेष प्राविण्य आर्ची आव्हाद (महाड) गायन या सर्व विजयी स्पर्धकांना आयोजकांच्या वतीने आकर्षक चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. तसेच सहभागी स्पर्धकांना सन्मान चिन्ह देण्यात आले.या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण चित्रपट अभिनेते नितीन बोधारे तसेच माणगावचा सुपुत्र चला हवा येऊ द्या फेम बालकलाकार साईराज सागळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# सोलापूरजवळ खासगी आराम बसला आग, जिल्ह्यातील लागोपाठ पाचवी घटना

**सोलापूर: प्रतिनिधी**



सोलापूर–पुणे महामार्गावर टेंभुर्णीजवळ एका धावत्या खासगी प्रवासी आराम बसला अचानकपणे आग लागली. सुदैवाने बस चालकाने वेळीच प्रसंगावधान राखून सर्व प्रवाशांना सुखरूपपणे बसमधून खाली उतरविले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. अलीकडे सोलापूर परिसरात रस्त्यावर धावत्या बसेससह अन्य वाहनांना आग लागण्याची ही पाचवी घटना आहे.

टेंभुर्णीजवळ वेणेगाव येथे एलपीजी गॅस पंपासमोर सकाळी आठच्या सुमारास बेस्ट एक्सप्रेस नावाची खासगी प्रवासी आराम बस हैदराबाद येथून मुंबईकडे जात असताना अचानकपणे बसच्या इंजिनमधून धूर निघून आग लागल्याचे दिसून आले. बसचालक अब्दुल इम्तियाज (रा. हैदराबाद) यांनी अजिबात विचलित न होता प्रसंगावधान राखून सर्व प्रवाशांना बसमधून तत्काळ खाली उतरण्याच्या सूचना दिल्या. बसमध्ये १५ प्रवासी होते.

सर्व प्रवासी जीवाच्या आकांताने बसमधून खाली उतरले तरीही त्यांच्या पिशव्या, सामान बसच्या डिकीत होते. परंतु बस जळत असताना प्रवाशांना आपापले सामान डिकीमधून काढण्यास मज्जाव करण्यात आला. त्यानंतर काही क्षणातच बसला लपेटलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले होते.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार व सहायक पोलीस निरीक्षक गिरीश जोग हे घटनास्थळी धावून आले. अग्निशमन यंत्रणेला पाचारण करण्यात आले. सुमारे दीड तासानंतर आग नियंत्रणात आणण्यात अग्निशमन यंत्रणेला यश आले. बसचालक अब्दुल इम्तियाज यांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेची नोंद टेंभुर्णी पोलीस ठाण्यात झाली आहे.

काही दिवसांपासून भर दुपारी तळपत्या उन्हात रस्त्यावर धावणाऱ्या तीन बसेससह एक मोटार आणि एक दुचाकी अशा पाच वाहनांना आग लागून सर्व वाहने भक्ष्यस्थानी पडली आहेत. अलीकडे तापमानाचा पारा खाली उतरल्याने उष्णता घटली तरीही रस्त्यावर वाहनांना आग लागत आहे. टेंभुर्णीजवळ घडलेली खासगी आराम बस जाळीत घटना सकाळी आठच्या सुमारास घडली आहे. त्यामुळे आगीचे निश्चित कारण पडताळून पाहण्याची जबाबदारी राज्य परिवहन विभागाच्या यंत्रणेवर आली आहे.

# सोलापूर–पुणेदरम्यान रेल्वेगाड्यांवर दगडफेक

**सोलापूर : प्रतिनिधी**



कुर्डूवाडी–जेऊर दरम्यान भाळवणी येथे मुंबई–हैदराबाद एक्स्प्रेस रेल्वेगाडीवर अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केली. यात गाडीच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आणि तीन प्रवासी जखमी झाले. त्या पाठोपाठ कर्नाटक एक्स्प्रेसवर झालेल्या दगडफेकीत एक प्रवासी जखमी झाला. रात्री उशिरा घडलेल्या या घटनेची नोंद कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात झाली आहे.

मुंबई–हैदराबाद एक्स्प्रेसवर झालेल्या दगडफेकीत विजयकुमार योगी (वय ३६), शरद राहुल नाईक (वय ३८) आणि लक्ष्मी वडतिलम हे तीन प्रवासी जखमी झाले. या जखमींना कुर्डूवाडी रेल्वे स्थानकावर उतरवून त्यांच्यावर रेल्वे रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यात आले. नंतर त्यांना सोलापूरकडे रवाना करण्यात आले. विजयकुमार योगी हे राजस्थानचे राहणारे असून, ते मुंबईहून हैदराबादकडे निघाले होते. दगडफेकीत त्यांच्या डोक्याला जखम झाली.

या घटनेच्या पाठोपाठ कर्नाटक एक्स्प्रेसवरही अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केली. त्यात एका प्रवाशाला जखम झाली. अंधारात दगडफेक करणारे नंतर पळून गेले. दगडफेक करणारे चोरटे असावेत. लूटमार करण्याच्या हेतूनेच त्यांनी दगडफेक केली असावी, या संवेदनशील भागात रेल्वे सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून प्रवाशांना स्वतःच्या सुरक्षिततेसाठी खिडक्या बंद करण्याच्या सूचना दिल्या जातात.

# पनवेलमध्ये तांदळाची तस्करी १२७९ गोणी तांदूळ जप्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई गोवा महामार्गावरील पळस्पे फाटाजवळील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंडजवळ बुधवारी (७ मे) सायंकाळी साडेचार वाजता सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील १२७९ गोणी तांदळाने भरलेला ट्रक पनवेलच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी पनवेल शहर पोलिसांच्या मदतीने पकडला. हा तांदळाचा साठा खालापूर येथील जय आनंद फुड इंडस्ट्रीज कंपनीचा असल्याचे पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात उघड झाले आहे.

गरीब नागरिकांच्या हक्काचा तांदूळ परदेशात पाठविण्यासाठी पनवेल येथे आणणार असल्याची माहिती पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांना मिळाली होती. पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांसह धनवे यांनी सापळा रचला. पळस्पे येथील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंड येथे एक ट्रक पोलीस पथकाला सापडला. मात्र तांदळाने भरलेला दुसरा ट्रक तेथून चालकाने पळवला. ट्रकचालक शिवप्रसाद सरोज याच्याकडे पोलिसांनी चौकशी केल्यावर त्याने १२७९ गोणी तांदूळ साठा खालापूर येथील आनंद फूड इंडस्ट्रीजच्या मालकाचा असल्याचे सांगितले.

जल वाहतुकीने देशातील रेशनिंगचा तांदूळ परदेशात पाठविणारी टोळी सक्रिय आहे. तस्करी करून विक्रीसाठी पनवेल हे सुरक्षित ठिकाण मानले जाते.


# भारताच्या यशासाठी शतचंडी यज्ञ

**नागोठणे : बातमीदार**

भारत–पाकिस्तान युद्धात भारताचा विजय व्हावा म्हणून सनातन संस्थेच्या वतीने होणाऱ्या ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त २० ते २२ मे २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत २५ पुरोहितांद्वारे शतचंडी यज्ञ करण्यात येणार आहे. हा यज्ञ सर्व नागरिकांसाठी खुला असून यात देशविदेशातील नागरीक सहभागी होणार आहेत अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी दिली आहे.फर्मागुडी, फोंडा, गोवा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर महोत्सव होणार आहे.

## दुखवटा

### महामूद धुनवारे



**माणगाव :** जुने माणगाव मस्जिद मोहल्ल्याचे माजी अध्यक्ष पैगंबरवासी महामूद फक्रुद्दीन धुनवारे यांचे गुरुवार दि.८ मे २०२५ रोजी पहाटे ३ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय – ६८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,एक भाऊ,एक बहीण,एक मुलगा,दोन मुली,जावई,सुना,नातवंडे,पतवंडे असा मोठा परिवार आहे.

# करंजा किनाऱ्यावर एलईडी बोटींवर कारवाई

**उरण : रामप्रहर वृत्त**

करंजा बंदर परिसरात मत्स्यव्यवसाय विभागाच्या परवाना अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी छापा टाकत दोन एलईडी मासेमारी बोटींवर कारवाई केली. केंद्र व राज्य सरकारने एलईडी पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातलेली असतानाही या तंत्राचा वापर करीत खोल समुद्रात मासेमारी केली जात आहे.

एलईडी पद्धतीने मासेमारी करीत असतांना लाखोंच्या संख्येने मासे जाळ्यात पकडले जातात. यात माशांचे लहान जीवही पकडण्यात येतात. मात्र यातील जीव हे मृत पावतात त्यामुळे पुढील मासे आणि प्रजनन थांबून माशांची व काही ठराविक जातीच्या माशांची संख्याही कमी होऊ लागली आहे. याच कारणास्तव शासनाने या पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातली आहे.



**एलईडी मासेमारी पद्धत**

खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेल्यावर अतिउच्च दाबाच्या वीज दिव्यांचे सेट घेऊन जात आहेत. हे दिवे समुद्रात सोडण्यात येतात. त्यामुळे या प्रकाशावर आकर्षित होऊन लाखोंच्या संख्येने विविध प्रकारचे मासे जाळ्यात येतात. या प्रकारामुळे जलद व मुबलक मासेमारी करून कमी वेळात जास्तीत जास्त नफा कमावला जात आहे.

**करंजा बंदर परिसरात एलईडी मासेमारी करणारे साहित्य असणाऱ्या करंजा आणि पेण तालुक्यातील दादर येथे प्रत्येकी एक अशा दोन बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा मत्स्यव्यवसाय उपायुक्त यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. यामध्ये बोटींना साडे पाच लाख रुपयांचा दंड आकारण्याची तरतूद आहे.**

**-सुरेश बागुलगावे, परवाना अधिकारी, मत्स्यव्यवसाय विभाग, उरण**

# मुलीस फूस लावून नेणाऱ्या तरुणास तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल, : वार्ताहर**

पिडीत मुलीस फुस लावून कायदेशीर पालकांच्या ताब्यातून घेऊन जाऊन बाहेर राज्यात पसार झालेल्या आरोपीस पनवेल तालुका पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे त्याचा पाठलाग करून त्याला पिडीत मुलीसह ताब्यात घेतले आहे.



या संदर्भात सदर मुलीच्या पालकांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करताच वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दीपक शेळके, पो.हवा.महेश धुमाळ, सतीश तांडेल आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाद्वारे या आरोपीचा शोध सुरू केला असता सदर आरोपी हा वेळोवेळी मोबाईल नंबर बदलत होता, त्याचप्रमाणे राहण्याचे पत्ते सुद्धा बदलत होता

तरी या पथकाने माघार न घेता त्याचा जी यादगीर राज्य कर्नाटक, सिकंदराबाद राज्य तेलंगणा व तिरुपती राज्य आंध्रप्रदेश याठिकाणी पाठलाग करून, तांत्रिक तपास करून अखेरीस आरोपीस संजय राठोड (२२ रा.खैरणेगाव) याला सिकंदराबाद रेल्वे स्टेशन येथे स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्यास व पीडित मुलीस ताब्यात घेऊन पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे हजर केले असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने व पीडितेने आरोपी विरुद्ध शारीरिक संबंध ठेवल्याने गुन्ह्यात पोक्सो कलम वाढ करून त्यास अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता ५ दिवस पोलीस कोठडी दिली आहे.

# अवकाळी पावसाने वीटभट्ट्यांचेही नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात सध्या सिमेंटचे जंगल उभारले जात असतानाही अनेक ग्रामीण भागात आजही विटभट्टी व्यवसाय तग धरुन आहे. परंतु गेल्या तीन दिवसामध्ये अचानकपणे आलेल्या अवकाळी पावसाने या विटभट्टी मालकांचे चांगलेच नुकसान केले आहे.

सोसाट्याच्या वार्यासह ढगांच्या गडगडाटाने आणि विजांच्या कडकडाटाने अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसाने वीटभट्टी मालकांवर अवकळा आल्याची स्थिती झाली आहे. संततधारेने वीटभट्टीच्या शेवटच्या टप्प्यात या व्यवसायाला चांगलाच तडाखा दिला आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून वीटभट्ट्यांचे नुकसान मालक टाळण्यासाठी वीट आणि कामगारांची कच्च्या विटांवर ताडपत्री आणि प्लास्टिक कापड टाकण्यासाठी धावपळ झाली. एप्रिल- मे महिन्यात कडक उन्हाळा असल्याने विटांचे उत्पादन मोठ्या संख्येने घेता येते. त्याचप्रमाणे या उन्हाळी वातावरणात कच्ची वीट सुकल्यानंतर या पोषक वातावरणात वीट उत्तमप्रकारे भाजून निघतात. मात्र अवकाळी पावसाने मातीच्या कच्च्या विटांचा तयार माल पावसात भिजून संपूर्ण विटांच्या मालाची नासधूस झाली आहे.



# तरुण बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीला भेटण्यासाठी ठाण्याला जात आहे असे सांगून घरातून निघून गेलेला ३२ वर्षीय तरुण घर न परतल्याने तो बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच्या घरच्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात दिली आहे.

आदित दिलीप क्षीरसागर (३२) असे त्याचे नाव आहे. त्याचा रंग सावळा, उंची पाच फूट दहा इंच, मध्यम बांधा, उभट चेहरा, नाक सरळ असे त्याचे वर्णन असून त्याने अंगात फुल बाह्यांचा पांढरा शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट घातली. त्याला मराठी आणि इंग्रजी भाषा बोलता येते अशी माहिती त्याच्या कुटुबियांनी दिली आहे. या तरुणाबाबत कोणाला माहिती मिळाल्यास त्यांनी तळोजा पोलिसांशी संपर्क साधावा. असे आवाहन पोलिसांनी केले आहे



**शिवाजीनगर :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मातोश्री स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांची बाराव्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन शिवाजीनगर येथे करण्यात आले होते. देवसागर साधक समाज आणि शिवाजीनगर, गव्हाण, न्हावे खाडी,कोपर यांच्या वतीने संगीत भजन, प्रवचन, कीर्तन आयोजित करण्यात आले होते तसेच शनिवारी माऊलींवर पुष्पवृष्टी करण्यात आली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी देशमुख, शकुंतला रामशेठ ठाकूर, पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, भाजपचे नेते संजय पाटील, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत,जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, अरुण ठाकूर, पनवेल नगर परिषदेच्या माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, संजय भगत, स्वप्नील ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, किशोर पाटील, अमोल ठाकूर यांच्यासह मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## सिद्धांत सामाजिक संस्थेतर्फे आज कोंढाणे लेणी स्वच्छता अभियान

**पनवेल; प्रतिनिधी**

कोंढाणे लेणीवर पनवेल येथील सिद्धांत सामाजिक संस्थेच्यावतीने बुद्ध पौर्णिमेच्या निमित्त रविवार ११ मे रोजी २०२५ रोजी स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. बुद्ध कालीन लेणी हे कर्जत तालुक्याचे आकर्षण असल्याने देशभरातील अभ्यासक या ठिकाणी लेणी पाहण्यासाठी येत असतात.

बुद्ध पौर्णिमा निमित्ताचे औचित्य साधून सिद्धांत सामाजिक संस्था या संघटनेचे वतीने कर्जतपासून काही अंतरावर असलेल्या बुध्द लेणी कोंढाणे लेणी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यावेळी पनवेल तालुक्याच्या पदाधिकारी यात सहभाग घेऊन मोहीम यशस्वी करणार असल्याचे मयुर जाधव यांनी सांगितले.

## खारघर से. १८ येथे 'सम-विषम पार्किंग'

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील सेक्टर-१८ येथील लक्सुस टॉवर सोसायटीसमोरील रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्क होत असल्याने येथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. याअनुषंगाने या रस्त्यावर ६०० मीटर लांबीपर्यंतच्या मार्गावर (अत्यावश्यक सेवेतील वाहने, शासकीय वाहने वगळून) सर्व प्रकारच्या वाहनांसाठी कायमस्वरूपी रस्त्याला समांतर 'सम-विषम पार्किंग' संदर्भात वाहतूक नियंत्रण अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे - यांनी याबाबत आदेश दिले आहेत.

येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूला आशिर्वाद हाईट्स, भारत संस्कार हौसिंग सोसायटी, लक्सुस टॉवर, सफायर सोसायटी, मोनार्च लक्सुरीया सोसायटी, गिरीजा हाईट्स, स्वागत सोसायटी व सुप्रिम टॉवरमधील रहिवाशांना वाहने पार्क करण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने त्यांची विविध प्रकारची वाहने रस्त्याच्या दुतर्फा अवैधरीत्या पार्क केली जातात. त्यातून नागरिकांच्या वाहनांना तसेच स्कूल बस, अग्निशामक दलाची वाहने, रुग्णवाहिका व घंटागाडी अशा अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना अडथळा निर्माण होत होता. त्यातून मार्ग काढण्यासाठी येथे सम-विषम पार्किंग सुविधा निर्माण करण्यात आल्याचे नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी सांगितले आहे.



**पनवेल : उत्तर भारतीय विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नागेंद्र तिवारी, सचिव सुनील तिवारी, वीरेंद्र मिश्रा, निशांत तिवारी, विजयराज शर्मा, उदयराज शर्मा आदी उपस्थित होते.**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या शिरपेचात कर्मवीर पारितोषिकाचा मानाचा तुरा

**उलवे : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाला पथक पर्यवेक्षणाने दोन फेरीत मूल्यांकन होऊन सूक्ष्म वकाटेकोर तपासणी करून उत्कृष्ट गुण मिळाल्याने दोन मे रोजी रयत शिक्षण संस्थेचा मानाचा कर्मवीर पारितोषिक पुरस्कार जाहीर झाला व ९ मे रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी दिनी सातारा येथे संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते व दिलीप वळसे-पाटील, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक दीपक भर्णुके व सहकारी शिक्षकांना सन्मानपूर्वक देण्यात आला.



या वेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक अनिल पाटील, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर उपस्थित होत्या. या वेळी कर्मवीरांनी सामान्य जनतेला सुशिक्षित करण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली आज रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी संस्था म्हणून कार्यरत आहे याचा मला अभिमान आहे अशी कृतज्ञता व्यक्त करून आपल्या जवळील धनाचा सदुपयोग समाजासाठी करण्यात जीवनाची धन्यता मानणारे रामशेठ ठाकूर यांचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे. असे गौरव उद्गार पवारसाहेबांनी अध्यक्ष भाषणातून काढले.

या वेळी संस्थेच्या विविध शाळा महाविद्यालयातील गुणी खेळाडू, गुणवंत विद्यार्थी, आदर्श शिक्षक, थोर देणगीदार यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे या विद्यालयाने अल्पावधीत शैक्षणिक वाटचाल अत्यंत वेगाने सुरू केली आहे त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका व मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर , विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भर्णुके त्यांचे सहकारी यांचे पुरस्कार देऊन कौतुक करण्यात आले.

जनरल बॉडी सदस्य वाय. टी.देशमुख, जे.एम म्हात्रे, महेंद्र घरत, युवा नेते परेश ठाकूर, सुधीर ठाकूर या सर्व मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यालयातील सर्वसेवकांचे अभिनंदन केले. स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी निलेश खारकर, निकिता खारकर, शैलेश भगत यांनीही मुख्याध्यापक व शिक्षकवर्गाचे अभिनंदन केले.



**पनवेल : पनवेल तालुका पोलीस ठाण्याला द्वितीय क्रमांकाचे गुणांकन मिळाल्याबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाटगे यांचे अभिनंदन करताना सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील. सोबत अल्पेश खंडागळे उपस्थित होते.**

# रसायनीत अवकाळी पावसाने दाणादाण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी-पाताळगंगा विभागात गेल्या तीन दिवस झालेल्या जोरदार सोसाट्याचा वारा व विजांच्या कडकडाटांसह आलेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत होऊन शेतकऱ्यांसह इतर क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिक, विक्रेते, वीटभट्टी व्यावसायिक, आंबा उत्पादक व जनावरांचा चारा, सर्वसामान्य गरीब नागरिकांचे लाकूडफाटा आदींचे मोठ्या प्रमाणात भिजून नुकसान झाले आहे.

लग्नसराई सुरू असल्याने अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे लग्नमंडपात जमलेल्या वऱ्हाडी मंडळींची चांगलीच तारांबळ उडाली, मंडपात जमलेले वधूवरांसह सगळेच पावसाने ओलेचिंब झाले, यामुळे लग्न असलेल्या मंडपातील वधूकडील मंडळींचे व मंडप व्यावसायिक यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तर आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंब्याच्या झाडांवरील तयार झालेला व हातातोंडाशी आलेला आंबा गळून पडल्याने त्यांचे देखील नुकसान झाले आहे. जांभळे व काजू सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पडून नुकसान झाले होते. यासोबतच वीटभट्टी व्यावसायिक यांच्या कच्चा विटा भिजल्याने त्यांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तर याठिकाणी विटा बनवण्यासाठी आलेल्या व उघड्यावर राहत असलेल्या मजुरांच्या जीवनावश्यक वस्तू भिजून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

जागोजागी सुरू असलेल्या विकासकामे व त्यांच्या बांधकाम साहित्याचे तसेच मजुरांचेदेखील नुकसान झाले आहे. तसेच ठिकठिकाणी वृक्षाच्या फांद्या कोसळल्या होत्या. एकंदरीतच या आलेल्या अवकाळी पावसामुळे सर्वसामान्य नागरिकांसह सर्वांनाच फटका बसला आहे.

## एसटीला धडक दिल्याने कारचालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

कार आणि बसचा अपघात झाल्याची घटना ओएनजीसी सिग्नल जवळ घडली.या अपघातात कार चालक जखमी झाला आहे.

प्रवाशांनी भरलेली ही एसटी बस ही केळवणे येथुन पनवेलच्या दिशेने जात होती. ही बस ओएनजीसी सिग्नल जवळ आली असता. पाठीमागून आलेल्या कारने एसटीला जोराची धडक दिल्याने हा अपघात झाला. या अपघातात कारचा चालका शेजारची बाजू एसीच्या मागच्या भागात अडकली. या अपघातात कार चालक जखमी झाला असून कारचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## स्पॅगेटी-रांजणपाडा-तळोजाकडे जाणाऱ्या रस्त्यावर नो-पार्किंग झोन

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील स्पॅगेटी, रांजणपाडा ते तळोजाकडे जाणार्या रस्त्यावर खासगी बसेस मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्क केल्या जातात. त्यामुळे रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. या ठिकाणी पार्क केल्या जाणार्या खासगी बसेसमुळे अपघात होऊ नयेत, तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व अत्यावश्यक सेवेतील तसेच इतर वाहनांना सदरचा रस्ता सुकर होण्यासाठी अत्यावश्यक सेवेतील वाहने, शासकीय वाहने वगळून इतर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी कायमस्वरूपी 'नो-पार्किंग झोन' संदर्भात अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. याबाबत नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी आदेश दिले आहेत.

रस्त्याच्या दुतर्फा खासगी बसेस पार्क झाल्याने एक मार्गिका बंद होते. परिणामी इतर वाहने मधल्या वाहिनीवर येतात. त्यामुळे तेथे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. या अनुषंगाने ही अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

# युद्ध सिनेमातील...

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

काश्मीरमधील पहलगाम येथे काही दिवसांपूर्वी पाकिस्तानी अतिरेक्यांनी निष्पाप पर्यटकांवर केलेला हल्ला, त्यामुळेच देशभरात उमटलेली संतापाची लाट आणि याला तोडीस तोड म्हणून ऑपरेशन सिंदूर असे दिलेले चोख उत्तर या सगळ्यातून आता देशभरात देशभक्तीची भावना निर्माण झाली आहे. प्रसारमाध्यमातून आज याच गोष्टीची भरपूर चर्चा होणे स्वाभाविक आहेच. अशा वेळेस हिंदीतील युद्धपट हीदेखील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहेच.

आपल्या देशात हॉलीवूडच्या दर्जाचे अस्सल थरारक युद्धपट निर्माण होत नाहीत, असे म्हणणारा एक वर्ग आपल्या देशात आहे. आज आपण पॅन इंडिया युगात आहोत. एका भाषेतील चित्रपट अन्य अनेक भाषेत डब करून अथवा इंग्लिश सबटायटल्सने जगभरातील अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत जाता येत आहे. त्यामुळे युद्धपटाचे बजेट वाढवायला काहीच हरकत नाही आणि कॉम्प्युटर व व्हीएफएक्सने युद्धाची दृश्य अतिशय प्रभावी करता येतीलच आणि आता तर चांगला कन्टेन असेल, तर त्याबाबतचे अधिकाधिक लहान लहान तपशील, संदर्भ व माहिती मिळतेय. त्याचा युद्धपट निर्मितीत फायदा होईल.

असे असले तरी आपल्याकडे निर्माण झालेल्या काही युद्धपटांनी समाजावर विशेष प्रभाव पाडला, चित्रपट रसिकांचा त्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला असे दिसते आणि तेच तर महत्त्वाचे असते. यशासह सामाजिक प्रभाव ही एक वेगळी गोष्ट आहे. पूर्वी आपले चित्रपट तांत्रिकदृष्ट्या फार प्रगत नव्हते, पण दिग्दर्शकाची इच्छाशक्ती प्रबळ होती. एक पॅशन म्हणून चित्रपट निर्मितीत ध्यास होता.

चेतन आनंद निर्मिती व दिग्दर्शित 'हकीकत' (मुंबईत प्रदर्शित २० एप्रिल १९६४) हा सर्वकालीन उत्तम युद्धपट आहे. आजही पाहताना तोच थरारक अनुभव येतो. भारत आणि चीन यांच्यात १९६२ साली झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवरील या चित्रपटात युद्धभूमीवरील समर प्रसंग, कधी घरची येणारी आठवण, कुटुंबाकडूनच्या पत्राची आठवण, तर कधी शत्रूच्या सैनिकाचा केलेला खातमा आणि त्याचा आनंद, तर कधी दुर्दैवाने आपल्या एखाद्या सहकारी जवानाला आलेले वीरमरण आणि तेव्हाचे दुःख अशा अनेक गोष्टी कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट स्वरूपात प्रभावीपणे साकारल्या होत्या. बलराज साहनी,









विजय आनंद, धर्मेंद्र, प्रिया राजवंश, संजय खान, शेख मुख्तार, जयंत वगैरे कलाकारांच्या भूमिका चित्रपटाची आणखी एक महत्त्वाची बाजू, तर कैफी आझमी यांच्या गीतांना मदन मोहनचे संगीत ही एक मोठी जमेची बाजू. होके मजबूर मुझे, मै ये सोचकर उसके घर से चला था, जरासी आहट होती है, मस्ती मे छेड के तराने तेरे प्यार का, अब तुम्हारे हवाले वतन साथीओ ही गाणी आजही हिट आहेत. प्रत्येक राष्ट्रीय सणाला अब तुम्हारे हवाले वतन साथीओ हे गाणे रेडिओपासून लाऊडस्पीकरपर्यंत हमखास असतेच. एक प्रचंड उर्जा निर्माण करणारे असे हे देशभक्तीवरील गाणे आहे. या गाण्यासह हा चित्रपट संपतो. हकिकत चित्रपटाचा शेवट असाच करावा की नाही या विचारात दिग्दर्शक चेतन आनंद होते, पण त्यांनी तोच निर्णय कायम ठेवला व तो योग्यदेखील ठरला.

जे.पी. दत्ता दिग्दर्शित 'बॉर्डर' (१९९७) हाही असाच एक माईलस्टोन युद्धपट आहे. आजच्या सामाजिक परिस्थितीत अनेक चित्रपट रसिक पुन्हा एकदा हा चित्रपट नक्कीच पाहतील.

आदित्य धर दिग्दर्शित 'उरी द सर्जिकल स्ट्राईक' (२०१८) हा आजच्या मल्टीप्लेक्स व ओटीटी युगातील लक्षवेधक आणि प्रभावी असा युद्धपट आहे. यात विकी कौशल, यामी गौतमी, कीर्ती कुलहारी, परेश रावल इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट वास्तवाच्या जास्त जवळ जाणारा असाच. पाकिस्तानला सडेतोड उत्तर देणारा असा चित्रपट.

या चित्रपटांचा खास उल्लेख करायला हवा. याशिवाय अनेक युद्धपट पडद्यावर आले, येत आहेत. श्रीधर दिग्दर्शित धरती (१९६८), रामानंद सागर दिग्दर्शित 'ललकार' (१९७२), चेतन आनंद दिग्दर्शित 'हिन्दुस्तान की कसम' (१९७३), जे. ओम प्रकाश दिग्दर्शित आक्रमण (१९७४), वीरू देवगन दिग्दर्शित हिन्दुस्तान की कसम अशी अनेक नावे घेता येतील. मनोजकुमार, जोगिंदर यांनी दिग्दर्शित केलेल्या काही चित्रपटात युद्धाचे संदर्भ पहायला मिळतील. आर.के. फिल्म या बॅनरखाली परमवीर चक्र या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली. सुधाकर बोकाडे निर्मिती व नाना पाटेकर दिग्दर्शित प्रहार चित्रपटातही युद्धाचा संदर्भ आहे. जॉन मॅथ्युज मथान दिग्दर्शित सरफरोश व अनिल शर्मा दिग्दर्शित गदर एक प्रेमकथा हे युद्धपट नाहीत. पण त्यातील पाकिस्तानवरील हल्ल्याचे स्वरुप भिन्न आहे. हे दोन्ही चित्रपट रसिकांना मोठ्याच प्रमाणावर आवडले. दोन्ही चित्रपट देशभक्तीची भावना जागी करतो आणि तेच महत्त्वाचे.

दिग्दर्शक जे.पी. दत्ता यांनी 'गुलामी' (१९८५)पासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले तेव्हा उत्तर प्रदेश (विशेषतः आग्रा, फतेहफूर सिकरी येथील आऊटडोअर्सचा भाग), राजस्थान (विशेषतः बिकानेर, जोधपूर वगैरे भागातील वाळवंटी प्रदेश) यावर जास्त लक्ष केंद्रित केल्याचे दिसून आले. गंमतीत असे म्हटले जाई की जे.पी. दत्ता अगोदर लोकेशन्स ठरवतो आणि मग मध्यवर्ती कथासूत्र ठरवून मग पटकथा संवाद लिहून घेतो. 'गुलामी'च्या खणखणीत यशानंतर त्याने एकामागोमाग एक अशा 'यतिम', 'हत्यार' आणि 'बटवारा' या तीन चित्रपटांचे दिग्दर्शन हाती घेतले आणि एकेका चित्रपटासाठी उत्तर प्रदेश, राजस्थान येथे दीर्घकालीन शूटिंग सत्रांचा डेरा टाकला. योगायोगाने हे तीनही चित्रपट १९८९ या एकाच वर्षी प्रदर्शित झाले आणि तीनही चित्रपटांना रसिकांनी नाकारले. अपयशाची हॅट्ट्रिक करणारा जे. पी. दत्ता आता काय बरे करणार असा प्रश्नच होता. अशातच एक दिवशी हाती आमंत्रण आले की, जे.पी. दत्ता दिग्दर्शित आणि ए.के. नडियादवाला निर्मित 'बन्दुआ' या चित्रपटाचा नटराज स्टुडिओत मुहूर्त! आणि त्यावर फक्त प्रमुख भूमिकेत अमिताभ बच्चन इतकेच होते. तोपर्यंत अमिताभने आम्हा सिनेपत्रकारांवरचा बॅन उठवला नव्हता त्यामुळे त्याची भूमिका असलेल्या अशा अनेक चित्रपटांच्या मुहूर्तांना आम्ही सिनेपत्रकार आवर्जून हजर राहत असू. या 'बन्दुआ'चा मुहूर्त आजही आठवतोय. प्रचंड गर्दीत धर्मेंद्रने मुहूर्त क्लॅप दिला आणि वहिदा रहेमानची खास उपस्थिती होती. हा चित्रपट त्या मुहूर्तालाच बंद पडला.

जे.पी. दत्ता सहजी हार मानणारा नव्हता. महत्त्वाचे म्हणजे त्याच्या अतिशय शिस्तबद्ध दिग्दर्शनाखाली भूमिका साकारण्यास अनेक स्टार तयार होते. त्याने दिग्दर्शित केलेल्या 'क्षत्रिय' (१९९३)ला चांगले यश लाभले आणि एक प्रकारे जे.पी. दत्ताचा कमबॅक झाला. खरंतर गुणवत्ता कायम असते, फॉर्म टेम्पररी असतो. चित्रपटाचे यशापयश प्रेक्षकांच्या हाती असले तरी खुद्द चित्रपटसृष्टीत दिग्दर्शकाची क्षमता, त्याला दृश्य माध्यमाची असलेली जाण आणि कलाकारांकडून काम करून घेण्याची पद्धत या गोष्टी चित्रपटसृष्टीला ज्ञात असतात. हे सगळे चित्रपटाच्या यशापयशाच्या पलीकडे जात असतात. 'क्षत्रिय'च्या यशानंतरचा जे.पी. दत्ताचा चित्रपट कोणता असेल याची उत्सुकता वाढली. हे एका गुणवान दिग्दर्शकाचे यश आहे.

जे.पी. दत्ता दिग्दर्शित 'बॉर्डर'ची घोषणा झाली तेव्हा एका गोष्टीची खात्री होती, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील १९७१ साली झालेल्या युद्धावर आधारित चित्रपट. या युद्धातील लोंगोवाल करार, भारतीय सैन्याचा विजय, जवानांना येत असलेली घरची आठवण, पत्रातून मनमोकळेपणाने भावना व्यक्त करण्याचं माध्यम, युध्धभुमिवरचे वातावरण याभोवती हा चित्रपट आहे. जे.पी. दत्ताने एकूणच या संदर्भात भरपूर माहिती मिळवली. त्या युद्धाशी संबंधित हयात असलेल्यांच्या भेटीगाठी घेतल्या. ही एक मोठी प्रक्रिया असते. प्रत्यक्ष घटनेवर आधारित चित्रपट असल्याने तर अधिकाधिक योग्य ती माहिती, तपशील, संदर्भ मिळवणे आवश्यक होते. अशा कलाकृतीत पूर्णपणे झोकून दिल्याशिवाय हे शक्य नसते. पूर्ण फोकस ठेवावाच लागतो. १९९५च्या सप्टेंबरमध्ये पटकथेवर काम सुरू केले आणि ते १९९६च्या एप्रिल महिन्यापर्यंत म्हणजे सात महिने चालले. हे सगळे होत असताना चित्रपटासाठी तंत्रज्ञ आणि कलाकारांची निवड याची प्रक्रिया सुरु होते. महत्त्वाचे होते ते कला दिग्दर्शन आणि छायाचित्रणकार. या चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण राजस्थानातील बिकानेर आणि जोधपूर येथे करायचे होते. कला दिग्दर्शन रत्नाकर फडके यांचे तर छायाचित्रण ईश्वर बिरदी आणि निर्मल जानी यांचे आहे. या सगळ्यात भले मोठे युनिट. असा खूपच मोठा पसारा असतो. त्यासाठी टीम चांगली लागते. हे सगळे होत असताना भारतीय लष्कर आणि हवाई दल यांच्याकडून बरीच मदत झाली. थीमनुसार अनेक तपशील, गोष्टी, संदर्भ तर मिळालेच, पण युद्धातील वाहने, रायफल, मशीनगन, गणवेश यांची बरीच माहिती मिळाली. १९७१च्या युद्धावर आता पंचवीस वर्षानंतर चित्रपट आकार घेत होता. त्याबरोबरच तेव्हाच्या यद्धातील सामुग्रीची माहिती महत्वाची होती. भारतीय लष्कराने पाकिस्तानी टाईप ५९ सारख्या टी.५५ टाक्या, ब्रेन मशीनगन, एसएलआरसारखी शस्त्रे, हॉकर हॅटर्स, मिग २१ याची माहिती दिली आणि मग त्यानुसार बरीच तयारी करावी लागली. इतका मोठा युद्धपट सहजी आकाराला येत नाही हेच खरे. त्यात पुन्हा अनेक कलाकारांची निवड करताना कोण कसे उपलब्ध आहे, कोणी होकार अथवा नकार देतेय हे सगळे होत होत चित्रीकरण सुरू झाले. त्यानंतर मात्र कामाने वेग घेतला. एक दर्जे दार चित्रपट घडत गेला. त्यामागचा खूप मोठा प्रवास पुढे चालत आला.

चित्रपट प्रदर्शनास सज्ज झाला असताना सर्वप्रथम गाजले ते जावेद अख्तर लिखित आणि अन्नू मलिकने स्वरबद्ध केलेल्या 'संदेसे आते है, हमे ले जाते है' हे गाणे. आजही हे गाणे लोकप्रिय आहे. युद्ध सीमेवरील जवान आणि त्यांचे दूरवर राहत असलेले कुटुंबीय यांच्यातील संपर्काचे महत्वाचे माध्यम म्हणजे पत्र. हे एकमेकांची ख्याली खुशाली विचारणारे आणि कळवणारे पत्र म्हणजे कमालीची भावनिक ओढ. उत्कट नाते. मनमोकळ्या होत असलेल्या भावना.

'बॉर्डर'ची पूर्णतेची आणि कॅसेट रिलीजची जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील जंगी पार्टी मला आजही आठवतेय. एक अतिशय भव्य युद्धपट येतो आहे हे यावेळी याची गाणी पाहताना जाणवले.

या चित्रपटात सनी देओल (मेजर कुलदीपसिंह चांदपुरी), जॅकी श्रॉफ (विग कमांडर एंडी बजवा), सुनील शेट्टी (कॅप्टन शेखावत), अक्षय खन्ना (सेकंड लेफलन्ट धरमवीर) यांच्यासह राखी गुलजार, तब्बू, पूजा भट्ट, कुलभूषण खरबंदा, सुदेश बेरी, पुनीत इस्सार, राजीव गोस्वामी, अमृत पाल इत्यादींच्याही प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाचे छायाचित्रण इश्वर बिदरी आणि निर्मल जानी यांचे, तर संकलन दीपक विरकूड यांचे आहे. या चित्रपटातील मेरे दुश्मन मेरे भाई, हमने जबसे मुहब्बत इत्यादी गाणीही लोकप्रिय आहेत. लोकप्रिय गाण्यांमुळे एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्या ओलांडूनही हिट असतोच. आजही या चित्रपटाचा सामाजिक प्रभाव कायम आहे हे विशेषच आहे. या चित्रपटाला वीस वर्षे पूर्ण झाली तेव्हा एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मी तेव्हा त्या सोहळ्याचा अनुभव घेतला असता चित्रपटाशी संबंधित सगळेच जुन्या आठवणीत रमल्याचे आणि थोडेसे भावूकही झाल्याचे जाणवले. एखाद्या कलाकृतीशी असे जोडलेले असणे या ग्लॅमरस क्षेत्रातील एक प्रकारचे माणूसपण आहे.

'बॉर्डर'नंतरच्या दिग्दर्शक जे.पी. दत्ताच्या चित्रपटातील 'एलओसी कारगील' (२००३) आणि 'पलटण' (२०१८) या युद्धपटांवर प्रचंड मेहनत घेतली, खूप खर्च केला, पण त्यांना 'बॉर्डर'ची उंची गाठता आली नाही... जे.पी. दत्ताने तरी असे निराश करायला नको होते. बॉर्डर चित्रपटाने जे कौतुक वाट्याला आले ते त्यानी दुर्दैवाने गमावले. बॉर्डर सर्वच बाबतीत जमून आलेला युद्धपट.

हकिकत, 'बॉर्डर' हे हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील प्रभावी युद्धपट आहेत. चित्रपट रसिकांनी त्यांना मनापासून भरभरुन प्रतिसाद दिला. उरी यापेक्षा वेगळा. तोही आवर्जून पाहण्यासारखा चित्रपट. सध्याच्या सामाजिक वातावरणात या चित्रपटांची चर्चा होणे, ओटीटीवर ते पाहिले जाणे स्वाभाविक आहेच.



# माओवादाचा विनाश अटळ

भारताचे गृहमंत्री अमित शाह यांनी मार्च २०२६पर्यंत भारतामधून माओवाद्यांचा संपूर्ण निपात करण्याचा संकल्प जाहीर केला आणि त्याप्रमाणे कृती करण्यास सुरुवात केली. केंद्र सरकारने जिथे जिथे माओवाद्यांचा उपद्रव आहे त्या त्या राज्यातील सरकारच्या मदतीने एक मोठी मोहीम हाती घेतली आणि हा हा म्हणता भारतातील दहशतवाद्यांच्या अंताला सुरुवात झाली. भारतात ज्या वेळी माओवाद टोकाला पोहचला होता त्यावेळी साधारणपणे १० हजार सशस्त्र माओवादी महाराष्ट्र, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार, छत्तीसगड आधी राज्यात नियमितपणे हिंसक कारवाया करीत होते, परंतु सरकारच्या 'झिरो टॉलरन्स' धोरणामुळे ही संख्या आता केवळ एक हजारपर्यंत खाली आली आहे. कित्येक माओवादी एकतर मारले गेले तर अनेकांनी सरकारसमोर शरणागती पत्करली आहे.

जंगलामध्ये प्रत्यक्ष शस्त्रे हाती घेऊन हिंसक कारवाया करणाऱ्या माओवाद्यांना तर आपण ओळखतोच, पण त्यामानाने शहरांमध्ये राहून अशा माओवादी कारवायांना मदत करायचे काम करणाऱ्या छुप्या शहरी माओवाद्यांना आपण ओळखण्यात कमी पडतो. हे सर्व आपल्याच आजूबाजूला असतात. वेगवेगळ्या संघटनांची नाव धारण करून आणि लोकांना भुलवू शकतील अशा तत्त्वज्ञानाच्या बुरख्याखाली हा संपूर्ण देश माओवादी करण्याचा प्रयत्न करणारे हे शहरी माओवादी हिंसक कारवाया करणाऱ्या माओवाद्यांचे स्लीपर सेल आहेत.

फुले, शाहू, आंबेडकर, पेरियर आदी समाजसुधारकांची नावे धारण करून, तर आता अगदी साने गुरुजींच्या नावानेदेखील हे शहरी माओवादी आपला अजेंडा पुढे रेटत असतात. प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या माओवाद्यांना रसद पुरवणे व सर्वसामान्य नागरिकांमध्ये लोकशाही मार्गाने स्थापित झालेल्या सरकारबद्दल असंतोष निर्माण करणे हे यांचे प्रमुख काम आहे. शहरी माओवादी जंगलात असलेल्या माओवादी सैन्याला शस्त्र, अस्त्र, आधुनिक उपकरणे याचबरोबर मनुष्यबळ पुरविण्याचेदेखील काम करतात. रावणाला जशी दहातोंडे होती तशी या शहरी नक्षत्रवादाला हजारो तोंडे आहेत. संपूर्ण भारतात वेगवेगळ्या नावाने सुमारे ४५०० संघटना माओवाद्यांसाठी सक्रियपणे काम करतात, तर नुसत्या महाराष्ट्रात यांची संख्या एक हजारहून अधिक आहे.

जंगलातील माओवाद्यांकडे शस्त्रे असल्यामुळे आणि ते उघडपणे हिंसक कृत्य करीत असल्यामुळे त्यांच्यावर उपलब्ध असलेल्या कायद्यानुसार कारवाई करणे सोपे जाते, परंतु त्या मानाने शहरी माओवाद्यांकडे फक्त प्रिंटेड मटेरियल एवढाच पुरावा असल्यामुळे त्यांच्यावर फारशी कारवाई करण्यास कायद्याने अडचण येते. डाव्यांची इकोसिस्टीम एवढी तगडी आहे की अथक प्रयत्नाने जरी पोलिसांनी या शहरी माओवाद्यांना अटक केली तरी वेगवेगळ्या समाजसेवी संस्था ह्युमन राईटच्या नावाखाली त्यांना मदत करायला पुढे येतात व कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन त्यांची सहज मुक्तता करतात.

जोपर्यंत शहरातील शहरी माओवाद आपण मुळासकट उपटून फेकत नाही तोपर्यंत माओवादाचा पूर्ण बिमोड होणे कठीण आहे हे लक्षात आल्यानंतर केंद्र सरकारच्या आदेशानुसार अनेक माओग्रस्त राज्यांनी याबाबतचा विशेष कायदा बनवला. यात छत्तीसगड, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा यासारख्या राज्याचा समावेश आहे. हा कायदा बनवत असताना तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यात काँग्रेसचे सरकार होते. ओडिशामध्ये बिजू जनता दलाचे, तर छत्तीसगडमध्ये भाजपचे सरकार होते. यावरून एक लक्षात येते की पक्ष कोणताही असो या सर्व राज्यातील सरकारांनी माओवाद पूर्णपणे ठेचण्यासाठी कायदे केले व त्याची प्रभावी अंमलबजावणी देखील केली. यामुळेच की काय या राज्यामध्ये माओवादाला मोठ्या प्रमाणात आळा बसला.

महाराष्ट्रामध्ये त्यामानाने हा कायदा बनविण्यासाठी थोडा उशीरच झाला, परंतु गेल्या अधिवेशनामध्ये फडणवीस सरकारने विशेष जनसुरक्षा विधेयक म्हणून शहरी माओवादाच्या विरोधामध्ये एक कडक कायदा करण्याच्या प्रयत्नात सुरुवात केली. या कायद्यामुळे माओवादाला समर्थन देणाऱ्या शहरी माओवादीच्या वेगवेगळ्या संघटनांवर बंदी घालणे सरकारला शक्य होणार आहे. एवढेच नव्हे तर या बंदी घातलेल्या संघटनेची मालमत्ता ताब्यात घेणेदेखील शब्द होणार आहे शक्य, परंतु असे असूनही या कायद्याद्वारे कोणत्याही व्यक्तीला वैयक्तिकरित्या दोषी मानण्यात येणार नाही. कारण हा कायदाच मुळी व्यक्तीच्या नव्हे तर दहशतवादी कृत्य करणाऱ्या संघटनेच्या विरोधात आहे. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य अबाधित राहणार आहे.

शहरी माओवादामध्ये काम करत असलेल्या संघटनांच्या बाबतीत उच्च दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याच्या सखोल अभिप्रायानंतरच त्यांच्यावर बंदी घालण्यात येण्याची तरतूद आहे. एवढेच नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या समकक्ष असलेल्या तिघा जणांच्या समितीकडे या अभिप्रायाची पडताळणी करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या समितीच्या शिफारसीनंतरच सरकार अशा संघटनांवर बंदी घालू शकेल, परंतु त्याआधी त्या संघटनेला समिती समोर आपली बाजू मांडण्याची संधी देखील देण्यात आलेली आहे. एवढेच नव्हे तर कायद्याप्रमाणे अशा प्रकारच्या बंदीला ती संघटना उच्च न्यायालयातदेखील आव्हान देऊ शकते. यावरून हा कायदा कोणाला त्रास देण्यासाठी नाही, कोणावर अन्याय करण्यासाठी नाही, घटनेच्या विरोधात नाही, वैयक्तिक स्वातंत्र्याला आव्हान देणारा नाही, घटनेने दिलेले आहे अधिकारांचे उल्लंघन करणारा नाही हे सिद्ध होते.

एकीकडे 'भारत तेरे तुकडे होंगे, इन्शाल्ला इन्शाल्ला' असे नारा देणारे असतात, तर अफजल गुरूच्या फाशीला विरोध करणारेदेखील असतात. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सला नाकारून बुद्धाला स्वीकारले त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन, त्यांच्या नावाने संघटना तयार करून त्यांच्या अनुयायांना बुद्धाच्या शांतीच्या मार्गावरून मार्क्सच्या हिंसेच्या मार्गावर घेऊन जाण्याचे भयंकर मोठे षडयंत्र शहरी माओवाद्यांनी आखले आहे. त्यांचे लक्ष वंचित समाज घटक आहेत. एकीकडे भारताच्या स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होण्याच्या वेळी म्हणजेच २०४७ साली हा देश विकसित झाला पाहिजे विश्वगुरू झाला पाहिजे आणि भारतातील एकही माणूस प्रगतीपासून वंचित नसला पाहिजे या ध्येयाने काम करणाऱ्या मोदी सरकारविरुद्ध २०४७ साली 'लाल किले पे लाल निशान' अशी घोषणा देऊन २०४७ साली भारत माओवादी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या दोन टोकाच्या विचारसरणीमधील हा संघर्ष शेवटी जरी आपणच जिंकणार असू तरी या संघर्षाला बळ देण्याचे काम जन सुरक्षा विधेयक करेल असा ठाम विश्वास आहे आणि त्यासाठी शांततेने सुसंस्कृत जीवन जगणाऱ्या सर्वसामान्य माणसांनी माओवाद्यांच्या भूलथापांना बळी न पडणे व या विधेयकाचे समर्थन करणे ही काळाची गरज आहे.

**–अवधूत वाघ**
**(लेखक हे महाराष्ट्र भाजपचे प्रवक्ते असून पेशाने अभियंता व वित्त व्यवस्थापन तज्ज्ञ आहेत)**

# आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस

दरवर्षी ११ मे रोजी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे योगदान आणि या क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा हा दिवस, जो दरवर्षी या दिवशी उत्साहात साजरा केला जातो. १९९८ साली आजच्याच दिवशी भारताने केलेल्या अणुचाचणीने आपल्या तंत्रज्ञानातील प्रगती जगाला दिसून आली. पोखरण अणुचाचणी तंत्रज्ञानातील प्रगतीचे प्रतीक म्हणून दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली राजस्थान येथील भारतीय लष्कराच्या पोखरण चाचणी क्षेत्रात शक्ती–I या आण्विक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीपणे पार पाडली. दोन दिवसानंतर लगेचच, पोखरण–II/ऑपरेशन शक्ती पुढाकाराचा एक भाग म्हणून यशस्वीपणे आणखी दोन आण्विक चाचण्या घेतल्या. या चाचण्यांमुळे भारत राष्ट्रांच्या न्यूक्लियर क्लबमध्ये दाखल होणारा सहावा देश ठरला आणि नॉन–प्रोलीफरेशन ऑफ न्यूक्लियर वेपन तहामध्ये भागीदार नसलेला प्रथम देश बनला.



११ मे १९९८ रोजी संरक्षण संशोधन आणि विकास संघटना कडून 'त्रिशूल' क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली, जे नंतर भारतीय लष्कर आणि भारतीय वायुसेनेत समाविष्ट करण्यात आले. कमी पल्ल्याचे, जलद–प्रतिक्रिया देणारे, जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र 'त्रिशूल' हा भारतातील एकात्मिक गाइडेड क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचा एक भाग होता.

देशाच्या या प्रचंड यशानंतर भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून घोषित केला. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो.

या दिवसापासून आजपर्यंत तंत्रज्ञान विकास मंडळाने तांत्रिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल शास्त्रज्ञ व अभियंत्यांचा सन्मान व प्रोत्साहन दिले आहे. वैज्ञानिक, डीआरडीओ (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था), भाभा अणु संशोधन केंद्र (बीएआरसी) आणि एएमडीईआर (अणु खनिज संचालनालय अन्वेषण आणि संशोधन) यांनी यशस्वीरीत्या चाचणी केली. हेच कारण होते ज्यामुळे भारत थर्मोन्यूक्लियर शस्त्रे तयार करण्यास सक्षम बनू शकला.

राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाच्या दिवशी हंस–१ या पहिल्या भारतीय विमानाने यशस्वी भरारी घेतली होती. त्याशिवाय डीआरडीओने त्याच दिवशी त्रिशूल क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणीही केली. हे एक क्षेपणास्त्र आहे, जे त्याच्या लक्ष्यावर वेगाने हल्ला करते. **(साभार : इंटरनेट)**

# तांबडी प्रकरणातील आरोपी निर्दोष

## निकाल धक्कादायक, सर्व समाजातून संतापाची लाट

**धाटाव : प्रतिनिधी**

पीडीत अत्याचार व खून तांबडी प्रकरणातील सर्वच आरोपींची माणगांव सत्र न्यायालयाने गुरुवारी निर्दोष सुटका केली. हा न्यायालयीन निकाल फारच धक्कादायक आहे. तालुक्यातील सर्व समाजातून संतापाची लाट उसळल्याचे शनिवारी समोर आले. या निकालानंतर सबंध तालुका आक्रोशाने अक्षरशः ढवळून निघाला. आरोपींची निर्दोष सुटका होण्याचा निकाल दुर्दैवी आहे. तपास यंत्रणेचा आम्ही निषेध करतो, असे म्हणत शनिवारी सकाळी रोहा येथे आयोजित पत्रकार परिषदेत उपस्थित मराठा समाजासह सर्व बहुजन समाजाने मंगळवारी रोहा पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्याचे संकेत दिल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.



जुलै २०२० रोजी तांबडीतील पीडीतेवर अत्याचार व नंतर खून केल्याची खळबळजनक घटना घडली होती. घटनेने सबंध जिल्हा हादरून गेला. पीडितेच्या न्यायासाठी सर्व समाज रस्त्यावर उतरला होता. राज्यातील अनेक नेत्यांनी आरोपींना तत्काळ अटक व प्रकरण फास्ट ट्रकवर चालवण्याची मागणी केली. दिवंगत नेते विनायक मेटे यांनी हा गंभीर विषय लावून धरला. आ प्रवीण दरेकर, चित्रा वाघ, दिवंगत माणिकराव जगताप यांनी घटनास्थळी भेट दिली होती. तत्कालीन आघाडी सरकारच्या काळातील मंत्री आदिती तटकरे, खा सुनिल तटकरेंनी पीडीतेला न्याय देण्यासाठी कठोर पाऊले उचलली. सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची निवड करणे, खटला फास्ट ट्रॅकवर चालवण्यासाठी तटकरे यांनी पाठबळ दिले. तकालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी तांबडी घटनास्थळी भेट घेत खटला सरकारतर्फे फास्ट ट्रकवर चालवण्याचे जाहीर केले.

तरीही खटला तब्बल ५ वर्षाहून अधिक काळ चालला, अखेरच्या क्षणापर्यंत संबंधीत आरोपींना कठोर शिक्षा होईल असे सांगणारे ॲड उज्वल निकम यांना निकालात सपशेल अपयश आले. सर्वच आरोपी सत्र न्यायालयात दोषमुक्त झाले. ही घटना समजताच संवेदनशील समाजाने आक्रोश व्यक्त केला. हा निकाल आम्हाला मान्य नाही म्हणत समाजाने शनिवारी पत्रकार परिषद घेऊन निषेध व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे कार्याध्यक्ष समीर शेडगे, भाजपचे अध्यक्ष अमित घाग, सकल मराठा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख, विभागीय नेते उदय शेलार, रमेश वायकर, महेश सरदार, अमित मोहिते, ॲड दीपक सरफळे, शाम लाड, हरेश नायनेकर, राजेश म्हांदलेकर यांसह विविध समाजातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आम्हाला हा निकाल मान्य नाही. घटना घडलीच नाही असाच हा निकाल आहे. मंत्री आदिती तटकरे, खा सुनिल तटकरे यांनी हा निकाल दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. पीडीतेला न्याय देण्यासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न करू असे सांगितल्याची माहिती देत प्रसंगी आक्रमक पवित्रा घेऊ अशी भूमिका माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांनी यावेळी व्यक्त केली.

हे आरोपी नाहीत मग आरोपी कोण, समोर का आणले नाहीत हा तपास यंत्रणेचा अपयश आहे. मंगळवारी सर्व समाजाच्या वतीने मारुती चौक ते पोलीस ठाणे असा मोर्चाचे आयोजन होत आहे, दरम्यान, आरोपींच्या निर्दोष सुटकेनंतर प्रशासनच्या नाकर्तीपणा विरोधात मंगळवारी मोर्चा काढण्याच्या घटनेने एकच खळबळ उडाली आहे या निकालाबाबत ॲड उज्वल निकम यांच्याशी चर्चा केली. तपासातील त्रुटी लक्षात घेत सखोल चौकशीचे सबंधीतांना निर्देश देण्यात आलेत, पिढीतेच्या न्यायासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न करू अशी ग्वाही खासदार सुनिल तटकरेंनी दिल्या.

> **तांबडी अत्याचार व हत्याप्रकरणी लागलेला निकाल हा अत्यंत अन्यायकारक आणि दुर्दैवी आहे. कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, उच्च न्यायालयात जाण्याची तयारी आहे**
> **–आदिती तटकरे,**
> **महिला व बाल विकासमंत्री**

# ऊसर बुद्रुक येथे जलजीवन मिशन नळ पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत माणगाव तालुक्यातील साई विभाग काकल ग्रामपंचायत हद्दीतील ऊसर बुद्रुक येथील जलजीवन मिशन नळपाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले.

सदर कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रवादी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणें, माणगाव तालुका अध्यक्ष बाळाराम नवगणे, माणगाव तालुका महिला अध्यक्ष संगीता बक्कम, ज्येष्ठ नागरिक संघटना अध्यक्ष शेखर देशमुख, राष्ट्रवादी माणगाव सरचिटणीस महादेव बक्कम, शिवसेना माणगाव तालुका प्रमुख गजानन अधिकारी,ग्रुप ग्रामपंचायत काकल सरपंच रितिका गायकवाड, शादाब गैबी,माणगाव तालुका उपाध्यक्ष व साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हुसैन रहाटविलकर, माणगाव तालुका शिवसेना (शिंदे गट) उपप्रमुख प्रशांत अधिकारी, साई ग्रामपंचायत उपसरपंच महंमद हनीफ खेरटकर व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उसर बुद्रुक येथील काळभैरव मंदिरामध्ये सालाबाद प्रमाणे होणाऱ्या सत्यनारायण पूजेचे औचित्य साधत आज जलजीवन मिशन नळपाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन करून संपूर्ण ऊसर गावातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची सोय खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नांना यश येऊन करता आले हे माझे भाग्यच आहे. ऊसर गावातील प्रत्येक प्रश्न मी हाताळण्याचा नक्कीच प्रयत्न करेन.आज ग्रामस्थांनी सांगितलेल्या स्मशानभूमी शेड, स्मशानभूमीचा रस्ता, तसेच अंतर्गत रस्ता हे सुद्धा आपल्या निधीतून करू असे अभिवचन यावेळी अदिती तटकरे यांनी दिले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावचे अध्यक्ष मधुकर सावंत,सचिव पंकज भुवड, खजिनदार संदीप सावंत, सचिन भुवड,अशोक सावंत, मुंबई मंडळ अध्यक्ष प्रकाश सावंत, सचिव विजय सावंत, खजिनदार अरुण सावंत,भूषण घोसाळकर,संतोष भुवड, रमेश सावंत, शरद घोसाळकर, नंदकुमार सावंत, मनोज सावंत किसन सावंत, राजेंद्र सावंत, महेंद्र घोसाळकर, सुधीर घोसाळकर व ग्रामस्थ, महिला मंडळ व मुंबई मंडळ यांनी परिश्रम घेतले.



# कर्जत जैन मंदिरासमोरील विजेचा खांब बदलला



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील जैन मंदिरा समोरील असलेल्या विजेचा खांब वाकडा झाला होता. तो खांब बदलण्यासाठी त्या परिसरातील नागरिकांची मागणी होती. ब्रेकर उपलब्ध झाल्यानंतर तो खांब बदलण्यात येईल. असे महावितरणने कळविले होते. मात्र पंधरा – वीस दिवस ब्रेकर उपलब्ध झाला नाही. नागरिक त्या ब्रेकरची वाट पहात होते. अखेर ब्रेकर उपलब्ध झाला आणि तो वाकडा झालेला विजेचा खांब बदलण्यात आल्याने नागरिकांना हायसे वाटले.

कर्जत येथे जैन मंदिरासमोर विजेचा खांब वाकडा झाला असल्यामुळे त्याची अवस्था फार बिकट झाली होती. सदर खांब जैन मंदिर च्या समोरच असल्यामुळे जैन मंदिरा बाहेर कायमच जैन भाविकांची वर्दळ असते. तसेच हा वर्दळीचा रस्ता आहे. हा खांब पडला तर अपघात होण्याची शक्यता असल्याचे कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी सदर बाब महावितरणच्या निदर्शनास आणून दिली होती.

त्यावर तुम्ही उल्लेख केलेल्या खांबाचे सर्वेक्षण सेक्शन ऑफिसर आणि हे काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या एजन्सीने केले आहे, परंतु काँक्रीटचा रस्ता असल्याने आणि काँक्रीट रस्त्याच्या कडेला खांब उभारण्यासाठी जागा नसल्याने कामाला विलंब झाला आहे. हा खांब बदलण्यासाठी काँक्रीट खोदण्यासाठी ब्रेकरची आवश्यकता आहे. पंधरा दिवसांच्या आत खांब बदलण्याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. असे कळविले होते. मात्र पंधरा दिवस झाले तरी तो खांब बदलण्याची कार्यवाही झाली नाही.

ओसवाल यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला. अखेर ब्रेकर उपलब्ध करून हा खांब बदलण्याचे काम हाती घेतले. शाखा अभियंता संजय पाल यांच्या मार्गदर्शनाखाली भर वस्तीत असलेला खांब बदलण्यात आला. संतोष करटूले, समर्थ मोरे या कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

# खोपोलीत वातूक कोंडीवर एकेरी प्रणालीचा उतारा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका क्षेत्रातील शीळफाटा शासकीय गेस्ट हाऊस ते इंदिरा गांधी चौक, खोपोली मुख्य बाजारपेठ, दीपक चौक, समाज मंदिर रोड या ठिकाणची वाहतूक कोंडी समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. मुख्य बाजारपेठ व शीळफाटा येथील वाहतूक समस्याने तर खोपोली शहर व संपूर्ण तालुक्यातील नागरिक हैराण असून, येथील वाहतूक कोंडीवर तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची गरज होती . शहरातील मुख्य बाजारपेठ मधील कोंडीवर सद्य स्थितीत पर्याय म्हणून पालिका प्रशासनाने एकेरी वाहतुकीचा उतारा काढला असून १० मे पासून या एकेरी वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी पालिका कडून परिपत्रक काढण्यात आले आहे. मात्र एकेरी वाहतुकीमुळे येथील व्यापार अस्थापणावर दूरगामी परिणाम होण्याची भीती व्यापारी



असोसिएशनकडून व्यक्त करण्यात येत आहे.

पालिकेकडून काढण्यात आलेल्या परिपत्रका नुसार खोपोली बाजारपेठ दीपक चौक , समाज मंदिर रोड, भाजीपाला मार्केट व सोमजाई वाडी रस्ता , जनता विद्यालय रस्ता , जुने नगरपालिका कार्यालय रस्ता रेल्वे स्थानक रस्ता अशा प्रमुख रस्त्यावर एकेरी वाहतूक व्यवस्था अमलात आणली जाणार आहे.

दुसरीकडे खोपोली शहरातील विविध व्यापारी संकुलात वाहन तळ सुविधा नाही.बाजारपेठ व इतर महत्वाच्या रस्त्यांवर हातगाड्या व फेरीवाल्यांचा कब्जा झाल्याची स्थिती बनली आहे. तसेच खासगी वाहने व मालवाहतूक करणारे मोठी वाहनेही मुख्य रस्त्यांवर बिनधास्त उभी करण्यात येत आहेत . त्यामुळे रस्ते अडविले जात असून, या ठिकाणी पायी चालणाऱ्याना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे .अतिक्रमणे ,अनधिकृत फेरीवाले व हातगाडी धारकांविरोधात ही नगरपालिका किंवा पोलिसांकडून प्रभावीपणे कारवाई होण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्यांवर खासगी वाहनांचा कब्जा तर दुसरीकडे व्यापारी संकुले व बहुमजली रहिवासी इमारतींना बांधकाम परवाना देतांना ,वाहन तळ निर्मितीची अट पाळली जात नाही.त्यामुळेच कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचा आरोप आहे. खोपोलीत मंजूर आराखडयात वाहनतळ असतांना, काही विकसकांनी वाहनतळांचे रुपांतर व्यापारी गाळयांत केले आहे .

> **बाजारपेठ मध्ये वाहतूक कोंडीची समस्या आहे . नगरपालिकाकडून ही समस्या कमी करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.शीळफाटा येथे रस्त्यांचे रुंदीकरण काम वेगात सुरू आहे. रस्ता रुंदीकरण झाल्यावर येथील वाहतूक समस्या मोठ्या प्रमाणावर कमी होईल . बाजारपेठ व संलग्न रस्त्यावरील कोंडी कमी करण्यासाठी एकेरी मार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. या बाबत व्यापारीवर्ग व नागरिकांनी सहकार्य करण्याची गरज आहे.**
> **– डॉ. पंकज पाटील ,**
> **मुख्याधिकारी खोपोली**

# माणगाव येथे बाल संस्कार शिबिर उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर विविध धार्मिक, आध्यात्मिक ,सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्याश्री गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळ माणगाव यांच्या वतीने श्री गोरक्षनाथ मंदिर माणगाव तपोवन येथेगुरुवार दिनांक ८ मे ते शनिवार दिनांक १० मे रोजी बाल संस्कार शिबिर अत्यंत उत्साहात संपन्न झाले.



उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांना धार्मिक, शैक्षणिक व आध्यात्मिक शिक्षण द्यावे या हेतूने सदर तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये प्रांतस्मरण ,ध्यानधारणा, व्यायाम योग, अध्यात्मिक प्रवचन, विविध खेळ ,चांगल्या सवयी तसेच व्यक्तिमत्व विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले .या शिबिरात एकूण ६० बालकांनी सहभाग घेतला होता. वय वर्ष सहा ते वय वर्ष १६ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांनी या बालसंस्कार शिबिरात सहभाग घेतला .

ओम चैतन्य ब्रह्मलीन परमपूज्य सद्गुरु माऊली बेटकर महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व रायगड भूषण परमपूज्य गुरुवर्य श्री दादा महाराज शिंदे व रायगड भूषण परमपूज्य गुरुवर्य श्री यशवंत महाराज गायकवाड व रायगड भूषण परमपूज्य शांताराम खाडे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांसाठी निवासी बालसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी सचिव भास्कर म्हस्के ,उपाध्यक्ष वामन म्हस्के ,सदस्य हरेश खडतर तसेच सर्व कमिटी सदस्य यांनी अथक प्रयत्न केले.

# बेलघर येथे विठ्ठल रखुमाई वर्धापन सोहळा उत्साहात

**तळा: प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील बेलघर येथे ४०वा श्री विठ्ठल रखुमाई वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. दोन दिवसीय हरीनाम सप्ताह आणि पालखी सोहळा उत्साहात संपन्न होत असताना



पहिल्या दिवशी सकाळी काकडआरती,दिंडी, ध्वजारोहण,ज्ञानेश्वरी पारायण, हळदीकुंकू क्रांती महिला मंडळ यांनीआयोजित केला होता.यावेळीमहिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. रात्री वासुदेव महाराज अडखळे यांचे हरिपाठ होते. दुसरा दिवस सकाळी काकड आरती नंतर काळ्याचे किर्तन. सोनाली ताई अडखळे यांचे संपन्न झाले दुपारी पालखी सोहळा सुरज महाराज अडखळे यांच्या उपस्थिती मध्ये टाळ मृदूंगाच्या तालावर भजन तसेच खालूचा बाजावर महिलांनी लेझिम खेळत नाचत भक्तगणांनी आध्यात्मिक आनंद घेतला.

# गांगवली येथे छत्रपती थोरले शाहू महाराजांच्या जन्मखुणांना वज्रलेपन

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुक्यातील गांगवली या गावांत छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचे पुत्र थोरले शाहू महाराज यांचा जन्म झाला होता. या ठिकाणी छत्रपती थोरले शाहू महाराजाचा जन्म झाला असे सिध्द झाले असून या ठिकाणी महाराणी येसूबाई, छत्रपती थोरले शाहू महाराज यांच्या साडेतीनशे वर्षापूर्वीच्या जन्म खूणा, पाऊल खूणा ह्या जीर्ण व नष्ट होत चालल्या असताना या खूणा श्री स्वामी मल्हारी प्रतिष्ठानच्यावतीने शनिवार दि.१० मे रोजी श्री स्वामी मल्हारी प्रतिष्ठान व शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना ऐतिहासिक वारसा मंदिर संवर्धन महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. गौरवभाऊ घोडे यांच्या हस्ते दूध अभिषेक घालून सुरक्षित करण्यात आले.



या गावचे ग्रामस्थ विजय तोंडलेकर यांनी गांगवली या ठिकाणी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म झाल्याचे विश्वास दिघे यांना सांगितले. विश्वास दिघे यांनी प्रत्यक्ष गांगवली या गावाला भेट देऊन पाहणी करून इथे असणाऱ्या ऐतिहासिक पुरातन खुणांना वज्रलेपन करण्याचे निश्चित केले.

यावेळी बोलताना डॉ. गौरवभाऊ घोडे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात ऐतिहासिक गड किल्ले, मंदिरे असून त्याकडे पुरातत्व खाते दुर्लक्ष करीत आहे. महाराष्ट्रात अनेक गड किल्ले, मंदिरे आहेत, त्यांची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे. मुघलांनी काही मंदिरे, किल्ले हे तोडलेले असून या गडकिल्ले व मंदिरांचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

परंतु ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या गडकिल्ल्यांकडे पुरातत्व खाते दुर्लक्ष करीत आहे. या ठिकाणी जन्मस्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ अशी कमानी उभारण्यासाठी ग्रामस्थांनीही सहकार्य करावे असे विश्वास दिघे यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितले. यावेळी डॉ.गौरवभाऊ घोडे श्री स्वामी ॐ मल्हारी प्रतिष्ठान अध्यक्ष व शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना ऐतिहासिक वारसा व मंदिर संवर्धन अध्यक्ष महाराष्ट्र राज्य, विश्वास दिघे,रघूनाथ दुबळ इनामदार,जयाजीराव बाजी मोहिते,शेखर साने, वैजनाथ महादेव मंदिर विश्वस्त ज्ञानदेव दाखिणकर, विष्णुबुवा दाखिणकर,शैलेश दाखिणकर,विजय दाखिणकर,विजय तोंडलेकर, गांगवली ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र दाखिणकर, मानसी तोंडलेकर, माजी सरपंच सविता दाखिणकर, चंद्रकांत सवातकर , दिलीप दाखिणकर, काशिनाथ दाखिणकर,गौतमभबुवा तायडे, तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद जाधव यांनी केले.

# गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक

**रेवदंड: प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई गावातील गुणवंत विदयार्थ्यांनी मिळविलेल्या सुयशाचे कौतुक ग्रा.प. सरपंच राजश्री मिसाळ यांनी करून अभिमान व्यक्त केला.

कोर्लई येथील मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परिक्षा सन २०२५ मध्ये मुरूड तालुक्यात प्रथम व जिल्हात नववा व राज्यात सतरावा क्रमांकाने उत्तीर्ण विदयार्थी निषाद रमाकांत ठाकूर– ८९ टक्के, तसेच विराध्या सनी सोडेकर ५८ टक्के, सारा शैलेश महालकर–५२ टक्के, लावण्या देवेंद्र पाटील ४४ टक्के, तसेच पी.एफ. श्री जवाहर नवोदय विदयालय स्पर्धा परिक्षा उत्तीर्ण निषाद रमाकांत ठाकूर ८९ टक्के व सारा शैलेश महालकर–७२ टक्के, तसेच इयत्ता पाचवी स्कॉलरशील परिक्षा उत्तीण विदयार्थी निषाद रमाकांत ठाकूर–८७.३३ टक्के, तसेच रायगड टॅलेन्ट सर्च उत्तीण विदयार्थी लावण्य देवेद्र पाटील, विराध्या सनी सोडेकर, तिर्था सिध्देश रोटकर, आदिता मुश्याक कुद्रेकर, ध्रुवी प्रशांत पाटील या विदयार्थ्यांनी सुयश मिळविले. या सुयश मिळविलेल्या विदयार्थ्यांचे कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ यांनी विशेष कौतुक केले, तसेच अभिमान व्यक्त केला.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवाशांसाठी उभारली जातेय दळणवळणाची सुविधा

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

अदानी समूहाचे सर्वे सर्वा गौतम अदानी यांनी जून महिन्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिला टप्प्यातून प्रवासी वाहतूक सुरू करण्याची घोषणा केली होती. विमानतळ टर्मिनलपर्यंत प्रवाशांना थेट पोहचता यावे यासाठी सिडको महामंडळ आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) उत्तम दळणवळणाची सुविधा उभारत असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुढील काही दिवसांत हा मार्ग विमान प्रवास करणाऱ्यांसाठी खुला होणार असल्याचे संकेत सिडकोने शुक्रवारी दिले.

विमानतळाला पश्चिमेकडून दळणवळणाची सुविधा प्रदान करण्याकरिता विकसित करण्यात येत असलेल्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम जून २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे सिडकोने स्पष्ट केले. यामुळे आम्रमार्ग आणि उलवे सागर किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होईल.



सिडकोतर्फे काही कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. अटल सेतू ते विमानतळादरम्यान कनेक्टिव्हिटी निर्माण करण्याकरिता उलवे किनारी मार्ग नियोजित आहे. आम्र मार्ग (राष्ट्रीय महामार्ग ३४८ ए) आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत चालावी याकरिता एमजेपीआरसीएलच्या प्रकल्पांतर्गत विमानतळ पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्गाचा समावेश करण्यात आला आहे.

पश्चिम प्रवेश आंतरबदल हा उलवे किनारी मार्गाच्या १.२ कि.मी.च्या उन्नत विमानतळ जोड रस्त्याला जोडला आहे. आंतरबदल मार्गावर दोन लूप आणि दोन रॅम्प यांचा समावेश आहे. आम्र मार्गावरून विमानतळाच्या दक्षिण बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता लूप ए व आम्र मार्गावरून विमानतळाच्या उत्तर बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता रॅम्प ए चा वापर करता येणार आहे. लूप बी आणि रॅम्प बीद्वारे विमानतळाकडून आम्र मार्गाच्या अनुक्रमे उत्तर व दक्षिणेकडे जाण्याकरिता पर्याय असणार आहे. उलवे नदी परिवर्तित प्रवाहावरील लहान पूल यांचा समावेश आहे. जूनपर्यंत पश्चिम आंतरबदल मार्ग पूर्णत: वाहतुकीकरिता खुला होणे अपेक्षित आहे.

## वन विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमणावर हातोडा

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोलीतील वन विभागाच्या जमिनीवर उभारलेल्या सुनील चौगुले स्पोर्ट्स क्लबवर वनविभाग, सिडको आणि नवी मुंबई महापालिका यांनी संयुक्तपणे अतिक्रमणाची कारवाई केली. शुक्रवारी पहाटे ६ वाजता कारवाई करून उभारलेला स्पोर्ट्स क्लब उध्वस्त करण्यात आला. तसेच या शेजारी असलेल्या नवी मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीतील खाडी किनाऱ्यावर भंगार गोडाऊन, झोपडपट्टी, गॅरेज, सर्व्हिस सेंटरवर देखील कारवाई करण्यात आली.

मध्यंतरी कांदवळवनावरील अतिक्रमणे काढण्याचे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले होते. अखेर तातडीने ही कारवाई पार पाडण्यात आली. याबाबत ऐरोलीतील सामाजिक कार्यकर्ते राहुल शिंदे यांनी जनहित याचिका देखील दाखल केली होती.

पहाटे ५ वाजल्यापासून संपूर्ण ऐरोली मतदारसंघात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. एकीकडे भारत पाकिस्तान



युद्ध सुरू असताना, ऐरोलीतील तगड्या पोलिस बंदोबस्त पाहून मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या नवी मुंबईकरांची मात्र घाबरगुंडी उडाली होती. अनेकांच्या मनात प्रश्नांचे काहूर माजले होते. अखेर हा पोलिस बंदोबस्त अनधिकृत बांधकामे हटवण्यासाठी असल्याचे समजल्याने ऐरोलीकर निवांत झाले. मात्र भल्या पहाटे कोणते अतिक्रमण उध्वस्त केले जाणार आहे याची उत्सुकता ऐरोलीकरांमध्ये दिसून आली. झोपडपट्टीवासियांनी या वेळी विरोध करण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रचंड पोलीस बंदोबस्त असल्याने कोणताही विरोध न होता अतिक्रमण हटविण्यात आले.

## नमुंमपामार्फत पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ

**नवी मुंबई : बातनीदार**

महानगरपालिका पदभरतीची जाहीरात दिनांक २७ मार्च २०२५ रोजी दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शुद्धीपत्रक निर्गमित करुन पदभरतीसाठीऑनलाईन अर्ज करण्याची मुदत १९ मे पर्यंत करण्यात आली आहे



महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २० मे, २०११ अन्वये जे उमेदवार इ. १० वी / १२ वी (माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षा ) न होता यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व इतर मुक्त विदयापीठ, ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त आहे, अशा मुक्त विद्यापीठातून पदवी धारण करणा-या उमेदवारांना लिपीक -टंकलेखक व लेखा लिपीक या पदांकरीता अर्ज करण्यात यावा याकरीता तरतूद करण्यात येत आहे.

सदर तरतुदीच्या अनुषंगाने लिपीक-टंकलेखक व लेखा लिपीक या संवर्गाकरिता तसेच जाहिरातीतील इतर सर्व संवर्गासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १९ मे २०२५ (वेळ रात्री ११.५५) पर्यंत वाढविणेबाबत तरतूद करण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## सीवूड्समध्ये आज परिसंवाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

यूपीएससी आणि एमपीएससी परीक्षा देणारया तरुण-तरुणीना परीक्षेत घवघवीत यश संपादन व्हावे तसेच विविध कौशल्ये आत्मसात करून काहींना स्वतःचा व्यवसाय सुरु करून उद्योजक व्हायचे असते अशासाठी योग्य मार्गदर्शन मिळावे, आपले करिअर घडवण्यास मदत व्हावी, या उद्देशाने शिवसह्याद्री ऐक्यवर्धक सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने परिसंवादाचे आयोजन मातृमिलन चर्च, सेक्टर - ४२ ए, सीवुड्स, नवी मुंबई या ठिकाणी रविवार, ११ मे रोजी दुपारी ४ ते रात्री ८ वाजे दरम्यान करण्यात आले आहे.

या वेळी प्रमुख मार्गदर्शन डॉ. अरुण पाटील ( प्रिंसिपल, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट, पुणे), डॉ. वैशाली पाटील (डीन-प्रशासन, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे), प्रा. वर्षा भोसले (शिक्षणतज्ज्ञ, सोमय्या महाविद्यालय) आणि एच. के. कदम (बेस्ट ट्रेनर अवॉर्ड विजेते-गोल्डन पिकॉक) यांचे मोलाचे मार्गदर्शन होणार आहे.

## चिरनेर येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती

**उरण : बातमीदार**

छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१४) उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती व श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील एकमेव उरण तालुक्यात श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. श्री छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी केली जाणार आहे.

सकाळी ९ वा. श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन लक्ष्मण केणी व ज्योती केणी यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी १० वा. श्री छत्रपती संभाजी महाराज जन्म सोहळा. या वेळी सुजाता गोंधळी यांचे पाळणा गीत, सकाळी ११ वाजता माजी सैनिक सचिन कडू व अश्विनी कडू तसेच नितेश सिंग



व मनीषा सिंग यांच्या शुभ हस्ते सत्यनारायनाची महापूजा, दुपारी ४ वा.शिवबंधू प्रेमी, समस्त शिवभक्त, ग्रामस्थ मंडळ चिरनेर उरण, प. पु. हभप हसुराम बाबा केळवणे यांचे शिष्य हभप अनिल महाराज (वशेणी), हभप गणपत महाराज (सावरसई) व शिष्यगण यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य पालखी मिरवणूक सोहळा, सायंकाळी ७ ते ८ महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ चिरनेर कातळपाडा, दुर्गा माता नवरात्र उत्सव चिरनेर, नवतरुण मित्र मंडळ कातळपाडा, अध्यात्मिक पौर्णिमा मंडळ चिरनेर भोम, अंकुश इलेव्हन, अर्जुन इलेव्हन, नरेंद्र महाराज सांप्रदाय चिरनेर, अभिनव मित्र मंडळ, निखिल स्पोर्ट्स, मंजित स्पोर्ट्स, छावा ग्रुप, सह्याद्री प्रतिष्ठान, आकृती कलामंच चिरनेर, ओम साई संवाद मंडळ चिरनेर, संभा एक छावा ग्रुप भोम, विघ्नहर्ता मित्र मंडळ कातळपाडा, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था आदी विविध सामाजिक संस्था श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करणार आहेत.

सर्व शिवभक्तांनी पालखी सोहळ्यास मोठया संख्येने उपस्थित राहून छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना द्यावी व दिवसभरातील विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाळीव श्वान मालकांनी परवाना घेणे बंधनकारक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाळीव श्वान मालकांना आता श्वान परवाना घेणे बंधनकारक असल्याचे महापालिकेने जाहीर प्रकटनाव्दारे कळवले आहे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११, कलम १४९(१) व १२७ कलम २ (क) अन्वये 'नमुंमपा कुत्र्यावरील कर नियमन १९९३' ही उपविधी लागू करण्यात आलेली आहे. या उपविधीस शासन निर्णय क्र.एनएमसी १६९२/४१०/सीआर४८/९२ नवि-२०, दि.२८ मे १९९३ अन्वये शासन मान्यताही मिळालेली आहे.

सदर उपविधीनुसार विभाग कार्यालयांमार्फत श्वान परवाने देण्याची कार्यवाही करण्यात येते. त्या अनुषंगाने सर्व पाळीव श्वान मालकांनी श्वान परवाना प्राप्तीसाठी www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'नागरिक सेवा' सेक्शनमध्ये आरोग्य विभागाच्या सेक्शनला भेट देऊन ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन करण्यात येत आहे.नमुंमपा कार्यक्षेत्रातील पाळीव श्वान मालकांनी श्वान परवाना घेणे बंधनकारक आहे.

## बारावीत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार



**उरण : वार्ताहर**

सारडे येथे गुरुवार (दि.८ ) रोजी . रविशेठ भोईर (उरण विधानसभा अध्यक्ष भाजप) यांच्याहस्ते सत्कार समारंभ संकल्प विनोद पाटील ९४.३३% आणि श्रेया धनेश पाटील ८६.८३% यांना वाणिज्य शाखेतून प्राविण्य मिळवल्याबद्दल करण्यात आला.

यावेळी मुकुंद बबन गावंड (उरण तालुका उपाध्यक्ष भाजप), राणीताई म्हात्रे (उरण तालुका महिला आघाडी अध्यक्ष)धनेश गावंड (उरण तालुका ग्रामीण अध्यक्ष),प्रसाद भोईर (उरण तालुका शहर अध्यक्ष),. देवेंद्र पाटील (उद्योगपती),. निलेश म्हात्रे (युवानेते),प्रशांत ठाकूर (चिरनेर पंचायत गण अध्यक्ष), अजित पाटील (आवरे पंचायत गण अध्यक्ष), मुकेश म्हात्रे (युवा नेते) अमित पाटील (भाजप गाव अध्यक्ष पाले), के. वाय.गावंड (ग्रामपंचायत सदस्य पिरकोन), रोशन पाटील (सरपंच ग्रामपंचायत सारडे),जीवन पाटील (उपसरपंच सारडे),. अमित म्हात्रे, महेश पाटील, अस्मिता म्हात्रे, प्रतिक्षा पाटील (ग्रामपंचायत सदस्य), सुवर्णा पाटील, श्रीमती संचिता गोंधळी (ग्रामपंचायत अधिकारी), महेश पाटील, सत्यवान पाटील (ग्रामपंचायत कर्मचारी),नागेंद्र म्हात्रे (सारडे विकास मंच अध्यक्ष), . मनोहर पाटील सर,. संदीप पाटील (माजी सरपंच साडे), भार्गव म्हात्रे (माजी सदस्य),निशिकांत पाटील,. रुपम पाटील, हितेश म्हाते, बळीराम पाटील, तुळशीराम पाटील, विनोद पाटील, हरिश्चंद्र पाटील, श्रीधर म्हात्रे, महादेव पाटील व सारडॅ ग्रामस्थांच्या उपस्थितीत सत्कार आयोजित करण्यात आला.

## नवी मुंबई मेट्रोची सुट्ट्यांच्या दिवशी दर १५ मिनिटांनी सेवा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई : सिडकोने नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ (बेलापूर ते पेणधर) साठी रविवार व सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी मेट्रो सेवा दर १५ मिनिटांनी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सुधारित वेळापत्रक ११ मे म्हणजेआज पासून लागू होणार आहेत.



सिडकोने मेट्रो गाड्यांच्या नियमित देखभालीच्या दृष्टीने तसेच प्रवासी वाढण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. नवीन वेळापत्रकानुसार, रविवारी व सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये बेलापूर आणि पेणधर मेट्रो स्थानकांवरून पहिली मेट्रो सकाळी ६ वाजता धावेल. बेलापूरहून शेवटची मेट्रो रात्री १० वाजता व पेणधरहून रात्री पावणेदहा वाजता सुटणार आहे. या दिवशी मेट्रो दर १५ मिनिटांच्या अंतराने उपलब्ध राहणार आहे. रविवार व सार्वजनिक सुट्ट्यांव्यतिरिक्त अन्य सर्व दिवशी मेट्रो सेवा पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच सुरू राहतील असे सिडकोने स्पष्ट केले आहे.

## चिरनेर येथे खरीप हंगाम नियोजन तयारीची कार्यशाळा

**उरण : प्रतिनिधी**

तालुकास्तरीय खरीप हंगाम नियोजन व पूर्व तयारीची कार्यशाळा चिरनेर येथे ऋतुजा नारनवर (सुळ) यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रारंभी कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत यांनी प्रास्ताविकेतून खरीप हंगामाविषयी आढावा घेतला. या वेळी ऋतूजा नारनवर (सूळ) यांनी शेतकऱ्यांना कृषी योजनांची माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांनी खरीप हंगामाची तयारी करावी. तालुक्यातील शेतकऱ्यांना बी बियाण्यांची कोणतीही अडचण भासणार नाही. त्यांना हवी असणारी बी बियाणे उपलब्ध करून देऊ. अशीही त्यांनी या वेळी ग्वाही दिली.

खार जमिनीचे पनवेलचे मृदा शास्त्रज्ञ डॉ. मनोज वाहने



यांनी जमीन आरोग्य पत्रिकेवर आधारित सुपीकता निर्देशानुसार प्रात्यक्षिके, जमीन आरोग्याचे महत्त्व, मातीचे नमुने काढणे, रोपवाटिका व्यवस्थापन तसेच भात लागवड पद्धतीविषयी माहिती दिली तसेच या वेळी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिले. कृषी सहाय्यक अधिकारी भजनावले यांनी बिजप्रक्रिया व उगवण क्षमता आणि त्याचे महत्त्व प्रात्यक्षिकाद्वारे उपस्थित शेतकऱ्यांना दाखवून दिले. कृषी सहाय्यक अधिकारी आदिका पानसरे यांनी जैविक तसेच रासायनिक बिजप्रक्रिया व त्याचे फायदे याची माहिती दिली.

या वेळी पाणी फाउंडेशनचे डॉ.अविनाश पोळ यांचे ऑनलाईन मार्गदर्शन प्रोजेक्टरवर दाखवण्यात आले. या वेळी पाणी र्षेपवरींळेप चा पोवाडा ऐकविण्यात आला. हा पोवाडा ऐकून शेतकऱ्यांमध्ये शेतीमध्ये एक नवीन करण्याची नवी ऊर्जा निर्माण झाली.कृषी सहाय्यक अधिकारी विभावरी चव्हाण यांनी बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली.

ग्रामसेवक स्वाती पाटील तसेच तलाठी श्री जयहिंद कोळी यांनी खरीप हंगामात लागणाऱ्या मदतीबाबत उपस्थित शेतकऱ्यांना विश्वास दिला. पर्यवेक्षक बुरकूल यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## पावसाळ्यापूर्वी मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जुईनगरमधील सेक्टर २३, २४ आणि २५ सेक्टर तसेच जुईपाडा गाव-गांवठाण मधील मल:निस्सारण वाहिन्यांची पावसाळयापूर्वी सफाई करण्याची लेखी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष ॲड. नविन प्रतापे यांनी महापालिका आयुक्तांकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

पावसाळा आता काही दिवसावर आलेला आहे. जुईनगर नोडमधील मल:निस्सारण वाहिन्यांची तपासणी व सफाई करणे आवश्यक आहे. अनेकदा पावसाळ्यामध्ये या परिसरामध्ये रस्त्यावरील मल:निस्सारण वाहिन्याची झाकणे बाजूला पडतात अथवा त्या झाकणातून पाणी बाहेर पडत असते. पावसाच्या पाण्यात हेही पाणी वाहत असल्याने परिसरातील रहिवाशांना, पादचाऱ्यांना तसेच ये-जा करणाऱ्या वाहन चालकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. पावसाळीपूर्व कामांमध्ये आपण गटारांची सफाई करतो, वृक्षछाटणी करतो, त्याच धर्तीवर पावसाळयापूर्वी जुईनगर सेक्टर २३,२४ आणि २५ सेक्टर तसेच जुईपाडा गांव- गांवठाण परिसरातील रस्त्यावरील मल:निस्सारण वाहिन्यांची तपासणी करून सफाई करावी. जिथे जिथे चोकअप असेल तो काढण्यात यावा. जेणेकरून पावसाळ्यात स्थानिक रहिवाशांना दुर्गंधीचा सामना करण्याची व आजारी पडण्याची वेळ येणार नाही. आपण संबंधितांना तसे निर्देश द्यावेत अशी मागणी नवी मुंबई अध्यक्ष ॲड नविन प्रतापे यांनी केली आहे.

## नेरूळ येथे आज रक्त तपासणी शिबीर

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

कपिलवस्तु बुद्ध विहार सेक्टर १० नेरुळ यांचे विद्यमाने बुद्ध पौर्णिमा निमित्त मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन रविवार ११ मे रोजी,सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत कपिलवस्तु बुद्धविहारात ठेवण्यात आले आहे. गरजू नागरिकांनी तसेच बौद्ध धम्म उपासक व उपासिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे एल. आर. गायकवाड , सरचिटणीस, कपिलवस्तु बुद्ध विहार सेवा समिती यांनी कळविले आहे.



तसेच वैशाखी पौर्णिमा सोमवार १२ मे रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६९ वी जयंती या ठिकाणी साजरी होणार आहे. यावेळी सकाळी पंचशील ध्वजारोहण, बुद्धवंदना तर सायंकाळी भन्ते प्रज्ञावंत यांचे बुद्ध आणि धम्म यावर प्रवचन होणार आहे. त्यानंतर भन्ते चिवरदान आणि खिरदान होणार असल्याचे सविता भिसे व मंगेश रणदिवे यानी कळविले आहे.

## मालमत्ताधारकांनी केवायसी करण्याचे नवी मुंबई महानगरपालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांना महानगरपालिकेच्या डिजिटल सेवा अधिक सुलभ व प्रभावीपणे वापरता याव्यात यादृष्टीने 'केवायसी' प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आवाहन नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ताकराशी संबंधित विविध सेवा आणि सुविधा आता ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांना घरबसल्या आपल्या मोबाईलवरही मालमत्ताकर बिल पाहता येणार आहे तसेच त्याचा भरणा करता येणार आहे. त्याचप्रमाणे महापालिकेशी संबंधित विविध माहिती जसे की, महत्त्वाच्या सूचना, पाणीपुरवठा, अतिवृष्टीचा इशारा, वाहतूक कोंडी या संबंधीचे इमर्जन्सी अलर्ट त्वरित मिळू शकतील.

मालमत्ताकर विभागाच्या डिजिटल सेवेचा पूर्ण लाभ घेण्यासाठी 'केवायसी - आपले ग्राहक ओळखा' ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यासाठी https://www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर जाऊन QR CODE स्कॅन करून किंवा संबंधित लिंकवर क्लिक करून घधउ प्रक्रिया पूर्ण करता येईल.

मालमत्तेला घधउ जोडताना मालमत्ता धारकाचा मालमत्ता क्रमांक, मोबाईल नंबर, ईमेल आयडी इत्यादी तपशील भरावे लागतील. ही माहिती पूर्ण आणि अचूक भरल्यानंतर संबंधित खात्यातून SMS व Email द्वारे मालमत्ताकराची बिले, करभरणा करण्यासाठी लिंक तसेच संबंधित विभागाचे अपडेट्स मिळतील.

मालमत्ताकर हा महानगरपालिकेच्या महसूलाचा प्रमुख स्त्रोत आहे. या महसूलातूनच नागरी सेवासुविधांची परिपूर्ती केली जात असल्याने शहर विकासात योगदान देण्याच्या दृष्टीने नागरिकांनी वेळेत कर भरणा करणे अत्यावश्यक आहे. सुलभ रितीने मालमत्ताकर भरणा करता यावा यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने विविध ऑनलाईन माध्यमे उपलब्ध करून दिली असून त्यासाठी आवश्यक डिजिटल प्रक्रिया पार पाडणे हा आपल्या जबाबदारीचा भाग आहे.

त्यामुळे KYC प्रक्रिया पूर्ण करून मालमत्ताकर बिले ऑनलाईन मिळवावीत आणि मालमत्ताकर वेळेत भरणा करावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

## कोकण रेल्वेतर्फे सुरक्षा चर्चासत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील कॉर्पोरेट कार्यालयात अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संतोष कुमार झा यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात सुरक्षित आणि कार्यक्षम रेल्वे परिचालन राखण्यासाठी सतर्कता, वेळेवर घटनांची माहिती देणे आणि सुरक्षा नियमांचे पालन करणे या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला.

आघाडीच्या कर्मचाऱ्यांना ओळख देण्याच्या एका नवीन उपक्रमाचा भाग म्हणून, १२ कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुकरणीय सतर्कतेबद्दल सन्मानित करण्यात आले आणि कर्तव्यावर असताना सुरक्षिततेशी संबंधित घटनांची त्वरित तक्रार केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्रे आणि जागेवर रोख पुरस्कार प्रदान करण्यात आले. कोकण रेल्वे नेटवर्कमध्ये नियोजित १२ सुरक्षा चर्चासत्रांच्या मालिकेतील हा पहिलाच कार्यक्रम होता. सर्व स्तरांवर सुरक्षिततेची संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी - बेलापूर, रत्नागिरी आणि कारवार येथे प्रत्येकी चार आयोजित केले जातील.

# बॅगेतील मृतदेहाचा अखेर उलगडा

## आरोपीला बंगळुरूहून अटक; कर्जत, नेरळ पोलिसांची कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत कर्जत लोणावळा रेल्वे मार्गावर रुळाच्या बाजूला पडलेल्या सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला होता. संबंधित महिलेच्या मृतदेहप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाने कुर्ला टर्मिनस येथे एक प्रवासी ट्रॉली बॅग घेऊन गाडीमध्ये चढतो, मात्र बंगळूर येथे उतरताना त्याच्याकडे ट्रॉली बॅग नसते या धाग्यावरून सीसीटीव्हीच्या मदतीने बंगळुरू येथे महिलेचा खून करणाऱ्या व प्रेत कर्जतजवळ टाकणाऱ्या व्यक्तीला अटक केली.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत स्टेशन ठाकुरवाडी गाव हद्दीत मुंबई ते पुणे जाणाऱ्या डाउन लाईन रेल्वे रुळाचे एका पोलजवळ गुलाबी रंगाची ट्रॅव्हल हब नावाची ट्रॉली बॅग सापडली होती. या ट्रॉली बॅगमध्ये एक अनोळखी महिलेला जीवे मारुन पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने तिचा चेहरा व डोक्याला प्लास्टीकच्या पिशवीने बांधून तिचे हात-पाय नायलॉनच्या दोरीने बांधलेल्या स्थितीत आढळून आली होती. या घटनेच्या अनुषंगाने पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे अंकित लोणावळा दूरक्षेत्र जि.पुणे लोहमार्ग येथील महिला पोलीस हवालदार छाया दिलीप चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि जिल्हा पोलीस उपअधीक्षक डी.डी. टेळे यांनी नेरळ व कर्जत पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाकडे हा गुन्हा तपासासाठी सोपवला होता.



या दोन्ही तपास पथकांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, ठाणे, कल्याण, पनवेल, कर्जत रेल्वेस्थानक व लोकमान्य टिळक टर्मिनस येथील एकूण २०० ते २५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. दरम्यान, लोकमान्य टिळक टर्मिनल्स येथे एक संशयित इसम घटनास्थळी मिळून आलेल्या ट्रॉली बॅगच्या वर्णनाप्रमाणे बॅग घेऊन ती खेचत नेत असताना दिसून आला. त्यामुळे या इसमावर संशय निर्माण झाला म्हणून लोकमान्य टिळक टर्मिनस येथील फ्लॅटफार्म क्रमांक ०४ वरील वेगवेगळे कॅमेरे वेगवेगळ्या अँगलने तपास करण्यात आला. त्या वेळी संशयित आरोपी व महिला १५ एप्रिल २०२५ रोजी रात्री १०.१७ वाजता मुंबई-कोइंबतूर एक्स्प्रेस नंबर ११०१३ या ट्रेनमधील कोच क्रमांक १०१४९६ बोगी क्र.ए-१मध्ये बसून गेल्याचे निष्पन्न झाले. तपासी पथकाने रेल्वे प्रशासनाकडील रिजर्वेशन विभागाचे मुंबई मुख्य कार्यालयात जाऊन नमूद बोगीमधून प्रवास करणाऱ्या इसमांची माहिती मिळवून मोबाईल क्रमांकाचे सीडीआर प्राप्त केले. दोघांनी तिकिट कोइंबतूरपर्यंत बुक केले होते, पण ते बंगळुरू येथे उतरल्याचे सीडीआरवरून निष्पन्न झाले.

नेरळ पोलीस ठाणे तपास पथकाने बंगळुरू येथे जाऊन केएसआर बंगळुरू सीटी रेल्वे स्टेशन येथील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता दोघे जण १ एप्रिल २०२५ रोजी ८.५६ वाजता मुंबई-कोइंबतूर एक्सप्रेस नंबर ११०१३ यामधून उतरताना दिसत होते, मात्र त्या वेळी नमूद आरोपीकडे ट्रॉली बॅग दिसून न आल्यामुळे त्याचेवरील संशय अधिक बळावला आणि नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने बंगळुरू येथे जाऊन आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

नेरळ पोलीस तपास पथकाने मोबाईलचा तांत्रिक पुराव्यांचा आधार घेऊन अत्यंत कौशल्याने आरोपीच्या वास्तव्याची माहिती प्राप्त करुन त्याला बंगळुरू येथून ताब्यात घेत कर्जत पोलीस स्टेशन येथे हजर केले. त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चोकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. दरम्यान, आरोपीला प्रथमवर्ग न्यायालय कर्जत येथे हजर केले असता न्यायालयाने आरोपीला १६ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**खुनाचे कारण अस्पष्ट**

हत्या झालेली २६ वर्षीय तरुणी अविवाहित होती, मात्र दोन आरोपी तरुण आणि ती महिला असे तिघे मुंबईत एकाच फ्लॅटमध्ये राहत होते. सोबत राहणाऱ्या त्या दोन्ही तरुणांचे त्या तरुणीशी नाते काय होते? आणि त्या तरुणीचा खून करण्याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्या साथीदाराचा शोध नेरळ पोलीस घेत आहेत, तर मयत महिलेचे नातेवाईक तिच्या मूळ गावावरून आंध्र प्रदेश राज्यातून कर्जत पोलीस ठाण्यात आले आहेत.

# उमटे धरण संघर्ष ग्रुपचे गाळ काढण्यासाठी निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

मुहूर्त नव्हे, गाळ काढा या विषयाच्या मथळ्याखाली उमटे धरणाचा गाळ काढणे व डागडुजीच्या संदर्भात उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड यांनी जिल्हाधिकारी रायगड, तसेच रा.जि. परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले.



या निवेदनात म्हटले आहे की, १४ मे २०२४ रोजी उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड यांच्या वतीने निवेदनाद्वारे गाळ काढण्यासंदर्भात तसेच बंधाऱ्याची तत्काळ डागडुजी करण्याच्या बाबतीत मागणी केली होती. हा पत्रव्यवहार करून एक वर्ष उलटूनही अद्यापही आपण गाळ काढण्याच्या कामाला शासनाकडून सुरुवात झालेली नाही. असे असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता (माणगांव) डी.ए.जाधव यांनी दिनांक १७ मार्च २०२५ रोजी वृत्तपत्रामध्ये उमटे धरणाचा गाळ काढण्याच्या संदर्भात रक्कम रू. ८,८१,३५,६३१/- रूपयांची ई निविदा सुचना क्र. १२२० सन २०२४-२५ निवीदा प्रसिद्ध केली आहे. शासनाकडून सलग तीन वेळा निविदा सुचना प्रसिद्ध करूनही प्रत्यक्षात गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही.

उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या ४६ गावे व ३३ आदिवासी वाडयांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. सद्यस्थितीत तीन दिवसाआड अशुद्ध व मातीमिश्रीत पाणीपुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

उमटे प्राधिकरण पाणी पुरवठा योजनेचे सविस्तर सर्वेक्षण करून योजनेच्या पुर्नस्थापनेचे व धरणाची क्षमता वाढविण्याचे काम महाराष्ट्र जमिन प्राधिकरणामार्फत करण्याचे ३१ ऑक्टोबर २०२२ च्या तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या बैठकीत ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे महाराष्ट्र जमिन प्राधिकरणाने नेमणुक केलेल्या तांत्रिक सल्लागारामार्फत अंदाजे २१५ कोटी रकमेचा एकत्रित प्रस्ताव सादर केला आहे. त्यापैकी पाईप लाईनच्या कामास तांत्रिक मंजुरी प्राप्त असून धरणाच्या कामास तांत्रिक मंजुरी मिळणे बाकी आहे असे उपअभियंता व पाणीपुरवठा उपविभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी १४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पत्रानुसार कळविले आहे.

उमटे धरणाच्या विविध कामासाठी २१२ कोटी तसेच १७ मार्च २०२५ रोजीची ई-निविदा सुचना रक्कम रू.८,८१,३५,६३१ ई-निविदा प्रसिध्द केलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध असताना उमटे धरणाच्या विविध कामांना विलंब का होत आहे? उमटे धरणाच्या गाळाच्या व शुध्द पाण्याच्या बाबतीत नागरिकांना त्यांच्या मुलभुत हक्कांपासून जाणीवपुर्वक तुम्ही वंचित ठेवत असल्याची आमची पक्की धारणा झाली आहे.

उमटे धरणाचा गाळ आणि धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या आम्हा नागरिकांची अवस्था ही इसापनितीच्या पुस्तकातील कोल्हा आणि करकोच्याच्या खिरीच्या गोष्टीप्रमाणे अधिकाऱ्यांनी केली आहे. खीर आहे, पण खाऊ शकत नाही.

उमटे धरणाचा गाळ काढण्यासाठी कोणतीही अडचण नाही तसेच गाळ काढणे कठीणही नाही. मागच्या वर्षी आम्ही साामाजिकदृष्ट्या मदत घेवून गाळ काढण्यास सुरूवात केली होती. धरणातील हजारो ब्रास गाळ काढण्यात आला. या धरणाची मालकी ही शासनाचीच असल्यामुळे परवानग्या व अडचणींचा प्रश्नच निर्माण होत नाही. येथील जनतेचा पाणी प्रश्न शासनाने सोडवावा. शासनाला गाळ काढण्याच्या संदर्भात स्थानिक पातळीवर मदत करायला आमचा ग्रुप तसेच येथील सामाजिक संस्था तयार आहेत, अशा आशयाचे निवेदन देण्यात आले.

> **उमटे धरणाच्या गाळाच्या बाबतीत उदासीनता दिसून येत आहे. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने दखल घेतली नाही, तर संविधानिक मार्गाने आम्ही आंदोलन करणार.**
> **-ॲड. राकेश पाटील**
> **उमटे धरण संघर्ष ग्रुप**

# खालापुरात ट्रेलर पुलावरून कोसळून चालक ठार

**खोपोली : प्रतिनिधी**

अरुंद रस्त्यावर वळण घेताना पुलाचा अंदाज न आल्याने कंटेनर पुलावरून खाली कोसळून चालक धर्मेंद्र साहू (वय २४, रा. मध्य प्रदेश) याचा मृत्यू झाल्याची घटना खालापुरातील नंदनपाडा येथे घडली.

धर्मेंद्र हा त्याच्या ताब्यातील कंटेनर घेऊन शुक्रवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास आजिवली नंदनपाडा मार्गावरून प्रवास करत होता. रस्ता चुकल्याने धर्मेंद्रने कंटेनर वळवून परत मागे फिरत असताना पुलाचा अंदाज न आल्याने कंटेनर पुलावरून खाली कोसळला. जीव वाचवण्याच्या नादात धर्मेंद्र याने कंटेनरच्या केबिनमधून उडी घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो त्याखाली दबला केल्याने त्याचा मृत्यू झाला. अपघाताची घटना समजतात खालापूर पोलीस, हेल्प फाउंडेशनचे सदस्य घटनास्थळी पोहचले. कंटेनर केबिन खाली दबलेल्या चालक धर्मेंद्र याला बाहेर काढून त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पाठवण्यात आला. या अपघाताची नोंद वावोशी पोलीस दूर क्षेत्र येथे करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# मुंबई-पुणे मार्गावर दोन अपघात; एक ठार, एक जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील माडप गावाच्या हद्दीत मुंबई लेनवर एक कार अतिवेगात जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार अज्ञात वाहनाला मागून धडकली. यात कारमधील एक जण जागीच ठार झाला.



दुसऱ्या घटनेत जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटात सायमाळजवळ कार समोर जाणाऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या उद्देशाने धडकली. यात कारचालक एकनाथ बारकू चावर (वय ४५) हे किरकोळ जखमी झाले. चावर कुटुंब नवी मुंबईवरून पुणे हिंजवडी येथे निघाले असता हा अपघात घडला. कारमध्ये एकूण पाच जण होते. त्यापैकी कारचालक किरकोळ जखमी झाल्याने त्याला खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# रोह्यात गणपती मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे अष्टमी शिंपी समाजाच्या १२९ वर्षाच्या पुरातन श्री गणपती मंदिराचा १२९वा वर्धापन दिन समाजाचे अध्यक्ष मकरंद बारटके व त्यांच्या पत्नी अनुराधा बारटके यांच्या हस्ते आध्यात्मिक आणि भक्तीभावनेने झाला.

यानिमित्ताने पहाटे पूजा, अभिषेक सर्व देवतांची विधिवत पूजा करणेत आली. सायंकाळी समाजाचे उपाध्यक्ष मनिष करंबे आणि त्याच्या पत्नी विदुला करंबे यांच्या हस्ते श्री सत्यनारायणाची महापूजा करणेत आली. दिवसभर अतिशय उत्सहात कार्यक्रम झाले. रंगी-बेरंगी सुबक रांगोळ्या, निरनिराळ्या फुलांच्या माळा तसेच विद्युत रोषणाई व निरनिराळी गाणी यांनी परिसर दुमदूमला होता. आरती प्रसादाचा कार्यक्रम झाला. धार्मिक कार्यक्रमाचे पौराहित्य रवींद्र पतंगे यांनी केले.



वर्धापन दिनासाठी अध्यक्ष मकरंद बारटके, कार्याध्यक्ष प्रेषित बारटके, उपाध्यक्ष मनिष करंबे, किरण बारटके, खजिनदार अजित पतंगे, समाजाच्या महिला अध्यक्ष संपदा पतंगे, प्रमोद पाटुकले, पूनम पाटुकले, रायगड जिल्हा शिंपी समाजाचे विश्वस्त व ज्येष्ठ पत्रकार अरुण करंबे तसेच समाजाच्या बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले.

श्री गणेशाचे व श्री सत्यनारायणाच्या पूजेचे भक्तांनी मंदिरात येऊन दर्शन व तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. या वेळी भाविकांनी आनंद व्यक्त केला. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी आढळलेल्या मृतदेहाची ओळख पटवण्याचे आवाहन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील जीवना बंदर समुद्रकिनारी एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला होता. हा मृतदेह २८ एप्रिल रोजी आढळून आला असून याबाबतची माहिती स्थानिक नागरिक धनेश रघुवीर यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात दिली.

पोलीस घटनास्थळी दाखल होताच मृतदेह तातडीने उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे शवविच्छेदनासाठी हलवण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुधाकर लहाने करीत असून श्रीवर्धन पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम १९४ अंतर्गत अज्ञात मृत्यूची नोंद अ.मु. रजि. क्र. ०९/२०२५ म्हणून करण्यात आली आहे.

आजअखेर या व्यक्तीची ओळख पटलेली नसल्याने श्रीवर्धन पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणालाही या मृत व्यक्तीबाबत कोणतीही माहिती असल्यास त्यांनी तत्काळ श्रीवर्धन पोलीस ठाणे ०२१४७-२२२२२८, तपास अधिकारी (पीएसआय सुधाकर लहाने) ९६३७१४००४४ यांच्याशी संपर्क साधावा. मृत व्यक्तीच्या ओळखीमुळे पुढील तपासाला दिशा मिळू शकते. म्हणूनच नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# मध्य रेल्वेकडून महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनेने अध्यक्षा आशा मीना यांच्या नेतृत्वाखाली ८ मे रोजी भायखळा येथील निर्मल पार्क येथील न्यू ऑफिसर्स क्लब येथे 'मे दिवस २०२५' मोठ्या उत्साहात साजरा केला. मध्य रेल्वेतील दोन दशकांहून अधिक काळ सेवेत योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेचा सन्मान करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




या कार्यक्रमादरम्यान विविध विभाग, कार्यशाळा आणि मुख्यालयातील एकूण २४ कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रत्येक पुरस्कार विजेत्याला त्यांच्या उत्कृष्ट वचनबद्धतेबद्दल कौतुकास्पद प्रमाणपत्र, भेटवस्तू आणि रोख रक्कम देण्यात आली. सर्वात ज्येष्ठ पुरस्कार विजेत्याचा सत्कार हा एक खास क्षण होता, ज्यांनी ३९ वर्षे विशिष्ट रेल्वे सेवा पूर्ण केली आहे आणि त्यांना 'गुड लक प्लांट' प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमादरम्यान मध्य रेल्वेतील पुरस्कार विजेत्यांचा सन्मान करण्यात आला, ज्यात नागपूर विभागातील तीन, पुणे विभागातील तीन, भुसावळ विभागातील तीन, मुंबई विभागातील दोन, सोलापूर विभागातील पाच, माटुंगा कार्यशाळेतील एक आणि मुख्यालय कार्यालयातील सात जणांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला उत्सवाचा आनंद देण्यासाठी, पुरस्कार विजेते आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी विविध मनोरंजक खेळ आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे आनंदी आणि समावेशक वातावरण निर्माण झाले.

सीआरडब्ल्यूडब्ल्यूओच्या सचिव श्रीमती बबिता पांडे यांनी प्रेरणादायी भाषण दिले, पुरस्कार विजेत्यांच्या समर्पणाचे कौतुक केले आणि त्यांच्या सतत कल्याण आणि आनंदासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला सीआरडब्ल्यूडब्ल्यूओच्या अध्यक्षा श्रीमती आशा मीना; सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ, उपाध्यक्ष श्रीमती प्रेरणा गोस्वामी; सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ, सचिव श्रीमती बबिता पांडे आणि कार्यकारी समितीच्या सदस्यांनी एकत्रितपणे पुरस्कार विजेत्यांच्या अमूल्य योगदानाचे कौतुक केले आणि कर्मचारी कल्याण यासाठी सीआरडब्ल्यूडब्ल्यूओची वचनबद्धता पुन्हा एकदा स्पष्ट केली.

# स्व. अशोकशेठ लोखंडे यांचा स्मृतिदिन

**मुरूड : प्रतिनिधी**

पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळ यांच्या विद्यमाने कै.अशोकशेठ लोखंडे यांचा ३७वा स्मृतिदिन समारंभ साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त वसंतशेठ लोखंडे, विश्वस्त महादेव गोळे, शाळेचे चेअरमन खेळू वाजे, सचिव संजय रेडीज,उपाध्यक्ष ठाकर गुरुजी, सदस्य मनोहर गायकवाड, परशुराम गायकवाड,उदय रेडीज, नथुराम अडखळे, रमेश पिंपळे, पदेरे गुरुजी, कैलास पायगुडे, पल्लवी नेरुरकर, भास्कर गोळे,संदीप मोडक, पत्रकार संजय रिकामे, दीपक शिगवण, पांडुरंग महाडिक, मारुती शिर्के, मुख्याध्यापक अरुण खुळपे, माजी मुख्याध्यापक संतोष रेडीज, निखिल लोखंडे, अलका लोखंडे, नमित पांढराकामे आदी मान्यवर मोठ्या संखेने उपस्थित होते.

या वेळी शाळेचे चेअरमन खेळू वाजे यांनी सांगितले की, अशोक लोखंडे हे उदार मनाचे व्यक्तिमत्व होते. गोर गरीब लोकांना मदत करण्यात त्यांनी आपले आयुष्य घालवले आहे. आज ते जर जिवंत असते तर ते निश्चितच महारष्ट्राचे मुख्यमंत्री बनले असते.विकास कामांची तळमळ व दूरदृष्टी असणारा नेता होता.अशोकशेठ लोखंडे यांचा पुतळा शाळेच्या आवारात बसवण्यासाठी आम्ही निश्चित प्रयत्न करणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.क्रीडा संकुलास अशोकशेठ लोखंडे यांचे नाव देण्यात यावे अशी आग्रही मागणी त्यांनी केली. कार्यक्रमात महादेव गोळे, मनोहर गायकवाड, रमेश पिंपळे, मारुती शिर्के, ठाकर गुरुजी आदींनी अशोक लोखंडे हे गरिबांचे कैवारी व दीन दुबळ्यांना मदत करणारे जागृत व्यक्तिमत्व होते, असे म्हटले.



# विराटही कसोटीतून निवृत्त होणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडिया पुढील महिन्यात पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौर्‍यावर जाणार आहे. या दौर्‍यापूर्वी कर्णधार रोहित शर्मा याने अचानक निवृत्ती घेतल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. त्यानंतर आता विराट कोहलीबाबत एक आश्चर्यकारक बातमी समोर आली आहे. विराटनेही इंग्लंड दौर्‍यापूर्वी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने यासंदर्भात बीसीसीआयलाही माहिती दिल्याचे वृत्त आहे, मात्र बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकार्‍यांनी या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती केली आहे.

विराटने आपला निर्णय घेतला आहे आणि आपण कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याची महिती त्याने बोर्डाला दिली. बीसीसीआयने त्याला पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे, कारण भारतीय संघ इंग्लंडच्या महत्त्वाच्या दौर्‍यावर जाणार आहे.



या विनंतीवर त्याने उद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली.

रोहित शर्माने कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर कोहलीने हा निर्णय घेतला आहे. पुढील महिन्यात इंग्लंडमध्ये होणार्‍या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी संघ निवडण्यासाठी अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीची काही दिवसांत बैठक होईल. असे मानले जातेय की विराट या वर्षाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियात झालेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीपासून आपल्या कसोटी भवितव्याचा विचार करीत आहे.

### मनवण्यासाठी खास बैठक

आयएएनएसच्या वृत्तानुसार विराट कोहलीच्या निवृत्तीसंदर्भातील मुद्यावर बीसीसीआयचा एक अधिकारी म्हणाला आहे की, विराट अजूनही फिट आहे. आजही त्याच्यात धावांसाठी भूक दिसून येते. ड्रेसिंग रुममधील त्याची उपस्थिती संघाचे मनोबल वाढवणारी ठरते. त्यामुळेच आम्ही त्याला निर्णयावर पुन्हा विचार करण्याची विनंती केली आहे. इंग्लंड दौर्‍यासाठी २३ मे रोजी टीम इंडियाची घोषणा करण्यात येणार आहे. त्याआधी बीसीसीआय निवडकर्त्यांची एक खास बैठक होणार असून या बैठकीत विराटसोबत चर्चा करण्यात येणार असल्याचे समजते. विराटचे मन वळवण्यात बीसीसीआय यशस्वी ठरले तर इंग्लंड दौर्‍यात टीम इंडियाला तो एक मोठा दिलासा असेल.

# राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा तायक्वांदो असोसिएशनने नुकत्याच झालेल्या रायगड जिल्हास्तरीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेनंतर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघ जाहीर केला आहे. ही स्पर्धा ११ ते १३ मेदरम्यान नाशिक येथील इनडोअर हॉल, विभागीय क्रीडा संकुलात होणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र करीत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष संदीप ओंबसे, सचिव गफ्फार पठाण, कोषाध्यक्ष डॉ. प्रसाद कुलकर्णी तसेच इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

संघ व्यवस्थापक म्हणून उत्कर्ष मिश्रा यांची निवड करण्यात आली आहे. संघ प्रशिक्षकपदी प्रथम ठोंबरे आणि साईराज पाटील यांची निवड करण्यात आली आहे. रायगड जिल्हा संघटनेचे सचिव सचिन माळी, कोषाध्यक्ष रोहित सिनलकर आणि सदस्य प्रतीक गायकवाड यांचेही



मार्गदर्शन संघाला लाभणार आहे.

**कॅडेट गट**

मुलींचा संघ : तनिष्का मिलिंद शिरशीवकर (२९ किलोखालील), लावण्या श्रीकांत देशपांडे (३३ किलोखालील), दिशा प्रविण पाटील (३७ किलोखालील), पूर्वा प्रदीप खारचे (४१ किलोखालील), चार्वी राजेश पेडणेकर (४७ किलोखालील), अवंतिका अजयन नायर (५१ किलोखालील), भार्गवी किरण ठाकूर (५९ किलोवरील), तनिष्का प्रशांत केतकर (फ्रीस्टाइल वैयक्तिक); मुलांचा संघ : श्लोक सचिन माळी (३३ किलोखालील), हर्षवर्धन जगदीश कदम (३७ किलोखालील), विशाल रमेश राठोड (४१ किलोखालील), आराध्या विद्याधर कदम (४५ किलोखालील), यथार्थ अमोल कदम (४९ किलोखालील), स्वरज स्वप्नील पाटील (५३ किलोखालील), सैश महेंद्र नाडकर (५७ किलोखालील), क्षितिज दीपक रांधे (६१ किलोखालील), नूपुर संदीप सावंत (६५ किलोवरील)

**ज्युनिअर गट**

मुलींचा संघ : मिरिन मझिद अन्सारी (४२ किलोखालील), ऐश्वर्या रमेश राठोड (५२ किलोखालील), मुलांचा संघ : दीप ज्ञानेश्वर कोंडीलकर (४८ किलोखालील), मानस योगेश घरत (६३ किलोखालील), मोहम्मद तमजीद शेख (७८ किलोखालील), साईराज बालाजी भोसिकार (७८ किलोवरील).

# यशस्वी जैस्वालचा यू-टर्न!

## गोवा नव्हे, मुंबई संघाकडूनच क्रिकेट खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटमध्ये आयपीएल सुरू असताना देशांतर्गत क्रिकेटमधून मोठी बातमी समोर आली होती. भारतीय संघाचा सलामीवीर आणि मुंबईचा युवा क्रिकेटपटू यशस्वी जैस्वाल याने मुंबईचा संघ सोडून गोव्याच्या संघाकडून खेळण्याचे निश्चित केले होते. ही विनंती मुंबई क्रिकेट संघटनेने मान्यही केली होती. त्यामुळे आता यशस्वी जयस्वालचा गोव्याकडून खेळण्याचा मार्ग मोकळा झाला होता, पण आता यशस्वीने आपल्या निर्णयावरून यू-टर्न घेतला असल्याचे सांगण्यात येत आहे.



वृत्तानुसार यशस्वी जैस्वाल याने मुंबई क्रिकेट असोसिएशनला एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात त्याने आधी मागितलेले 'ना हरकत पत्र' रद्द करण्याची मागणी केली आहे. त्याने पत्रात असेही नमूद केले आहे की त्याचा भविष्यात आपल्या कुटुंबासोबत गोव्यामध्ये जाऊन वास्तव्य करण्याचा प्लॅन होता, परंतु काही कारणास्तव तो प्लॅन सध्या रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईकडून देण्यात येणारे 'ना हरकत पत्र' रद्द करून त्याला यंदाच्या देशांतर्गत क्रिकेटच्या हंगामासाठी मुंबई संघाकडूनच खेळू दिले जावे. तो यंदाच्या हंगामातील मुंबईच्या सर्वसामान्यांच्या निवडीसाठी उपलब्ध असेल.

ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या ट्रॉफी २०२४-२५ मध्ये यशस्वीने सलामीवीर म्हणून अप्रतिम कामगिरी करून दाखवली होती. त्याने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ४३च्या सरासरीने ३९१ धावा ठोकल्या होत्या. त्यामुळे यशस्वी हा केवळ टीम इंडियासाठीच नव्हे, तर मुंबईच्या संघासाठी खूप महत्त्वाचा कसोटीपटू आहे. अशा परिस्थितीत यशस्वीने गोव्याच्या संघात जाण्याची इच्छा व्यक्त केली, त्या वेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनलादेखील आश्चर्याचा धक्का बसला होता, पण आता यशस्वीने यू-टर्न घेतला असल्यामुळे तो यंदाच्या हंगामात मुंबई संघाकडूनच खेळेल अशी शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, यशस्वीने केलेल्या ई-मेलला अद्याप एमसीएकडून कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही आणि यशस्वीच्या मागणीवर अद्याप कुठलाही निर्णयही घेतला गेलेला नाही.

### लाईन आळी प्रीमियर लीग रंगणार

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या १० वर्षांपासून शिवशक्ती मित्र मंडळ लाईन आळी पनवेलतर्फे आयोजित करण्यात येणारी लाईन आळी प्रीमियर लीग यंदाही रंगणार आहे. या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन ११ मे रोजी सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात विविध संघ सहभाग घेतात तसेच नामांकित क्रिकेट स्पर्धे प्रमाणे संघ मालक आपले खेळाडू विकत घेत असतात व त्यांना या क्रिकेट सामन्यामध्ये उतरवितात. स्पर्धा ओम हिरा अपार्टमेंटच्या समोर होणार आहे.

# खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पार्थ मानेचा 'रूपेरी' वेध!


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पार्थ मानेने नेमबाजीच्या १० मीटर एअर रायफलमध्ये रौप्यपदक जिंकून सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला आणखी एक पदक जिंकून दिले.

नवी दिल्लीतील कर्णी सिंग शुटिंग रेंजवर झालेल्या या स्पर्धेत मराठमोळ्या पार्थ माने याने पात्रता फेरीत ६३२.९ गुणांची कमाई करीत अव्वल स्थान पटकावित सुवर्णपदकाच्या आशा पल्लवित केल्या होत्या, मात्र कर्नाटकच्या नरिन प्रणवने अंतिम फेरीच्या एलिमिनेटर राऊंडमध्ये मोक्याच्या वेळी अचूक कामगिरी करीत २५२.९ गुणांसह सुवर्णवेध साधला.

पार्थ मानेला २५१.९ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. पात्रता फेरीत अखेरच्या आठव्या स्थानी राहिलेला हरयाणाचा प्रणव जिंदाल २२८.२ गुणांसह कांस्यपदकांचा मानकरी ठरला.

महाराष्ट्राच्या पार्थ माने याने शांभवी



क्षीरसागरच्या जोडीने १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक गटात सुवर्णपदकाला गवसणी घातली. होती. खेलो इंडिया स्पर्धेतील त्याचे हे दुसरे पदक ठरले. गत तामिळनाडू स्पर्धे तही त्याने सुवर्ण पदकाची कामगिरी केली होती. पनवेलमध्ये सुमा शिरूर यांच्या लक्ष्य अकॅडमीत तो कसून सराव करीत असतो.

# लहानग्या मुलाची जबरदस्त फटकेबाजी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतात क्रिकेट खेळ लहान मुलांपासून मोठ्या पर्यंत लोकप्रिय आहे. लहान मुलांना आपणही सचिन तेंडुलकर, विराट कोहलीसारखे खेळावे, असे वाटते. त्यासाठी लहानपणापासूनच मुले बॅट आणि बॉलने सराव करायला सुरुवात करतात. असाच एका तीन वर्षांच्या मुलाचा क्रिकेट खेळत असल्याचा व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल झालेला आहे. या व्हिडीओमध्ये त्याचे शॉट्स पाहून

### व्हिडीओ व्हायरल


लोक आश्चर्यचकित होत आहेत.

व्हायरल व्हिडीओमध्ये अवघ्या तीन वर्षांच्या मुलाने यॉर्कर चेंडूवर जबरदस्त फटके मारले आहेत. विराट कोहली आणि महेंद्रसिंह धोनीदेखील त्याच्या खेळाचे कौतुक करतील, असे म्हटले जात आहे. व्हिडीओमध्ये लहानगा कव्हर ड्राईव्ह आणि धोनीच्या ट्रेडमार्क हेलिकॉप्टर शॉटला उत्तम दर्जाने मारताना दिसत आहे. यॉर्कर चेंडूवर असे फटके मारणे हे काही मुलांना शक्य नाही, पण या मुलाने ते स्वतः खेळून दाखविले आहे. ते पाहिल्यानंतर युजर्स त्याच्या फलंदाजीचे कौतुक करताना दिसत आहेत.

**फलंदाजीचे कौतुक**

कमेंट सेक्शनमध्ये काही युजर्स लहान मुलाच्या फलंदाजीचे कौतुक करताना दिसत आहेत. एका युजर्सने लिहिले आहे की, त्याची फलंदाजी पाहिल्यानंतर, राजस्थान रॉयल्सने त्याला आतापर्यंत ९९ मिस्ड कॉल दिले असतील. दुसर्‍या युजर्सने म्हटले आहे की, चेन्नई सुपर किंग्जसाठी पुढचा थाला. तिसर्‍या युजर्सने म्हटले आहे की, भाऊ तीन वर्षांच्या वयात हेलिकॉप्टर, कव्हर ड्राइव्ह, स्लॉग स्वीप खेळतो. अद्भूत! चौथ्या युजर्सने म्हटलेय की, त्याचे भविष्य उत्तम असणार आहे.

# भारतीय सैनिकांसाठी विराट-अनुष्काची पोस्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तान देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतीय सैन्य युद्धभूमीवर पाकिस्तानचे डाव हाणून पाडले. दरम्यान, भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहली तसेच त्याची पत्नी व अभिनेत्री अनुष्का शर्माने भारतीय सैन्याचे कौतुक करणारी पोस्ट शेअर केली.

विराट कोहलीने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्याने लिहिले की, या कठीण काळात जे जिद्दीने देशाचे संरक्षण करीत आहेत अशा सशस्त्र दलांना आम्ही सलाम करतो आणि त्यांच्याबरोबर आम्ही एकजूटीने उभे आहोत. त्यांच्या अटल शौर्यासाठी आम्ही नेहमीच त्यांचे ऋणी राहू. त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आपल्या महान देशासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो. या पोस्टवर त्याने जय हिंद असे लिहिले आहे.


यासह विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्मानेदेखील पोस्ट शेअर करून भारतीय सैन्याचे आभार मानले आहेत. अनुष्काने पोस्ट शेअर करीत लिहिले, आम्ही भारतीय सशस्त्र दलाचे आभारी आहोत. या कठीण काळात त्यांनी आमचे नायकासारखे संरक्षण केले आहे. त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या योगदानाबद्दल आम्ही आभारी आहोत.

# आयपीएल फ्रँचायझींकडून भारतीय सैन्याचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तान देशांमध्ये तणावाचे वातावरण झाले आहे. दोन्ही देशांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे बीसीसीआयने आयपीएल २०२५ स्पर्धा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला गेला.

बीसीसीआयच्या बैठकीत आयपीएल स्पर्धा सुरू केव्हा होणार याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. ही स्पर्धा एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली आहे. त्यानंतर नवीन वेळापत्रकाची घोषणा केली जाईल. बीसीसीआयने घेतलेल्या या निर्णयाचे आयपीएल फ्रँचायझींनीदेखील स्वागत केले आहे तसेच भारतीय सैन्याचे कौतुक करणारे पोस्ट



आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केले आहेत.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू फ्रँचायझीने आपल्या एक्स अकाऊंटवर पोस्ट शेअर करत लिहिले की, देश संकटात असताना आम्ही आमच्या भारतीय सशस्त्र दलातील सैनिकांचा धैर्य आणि शौर्याला सलाम करतो. प्रत्येक भारतीयाच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करतो. जय हिंद!

चेन्नई सुपर किंग्ज फ्रँचायझीनेदेखील एक्स अकाऊंवरून पोस्ट शेअर करत भारतीय सैन्याला सलाम केला आहे. त्यांनी भारतीय जवानांचा फोटो शेअर केला आहे. या फोटोवर, देश प्रथम, इतर सर्व गोष्टी थांबू शकतात, असे लिहिले आहे. या फोटोला कॅप्शन देत त्यांनी, प्रत्येक पावलात हिंमत असते, आणि प्रत्येक श्वासात आपला अभिमान. आपल्या सैनिकांना खरंच सलाम करावासा वाटतो.., असे लिहिले आहे.

मुंबई इंडियन्सनेदेखील खास पोस्ट शेअर केली आहे. मुंबईने कॅप्शन देत, आम्ही आमच्या सैन्याच्या पाठीशी आहोत, असे लिहिले आहे. लखनऊ सुपर जायंट्सने, देश प्रथम अशी पोस्ट शेअर केली आहे.

# 'आम्ही सर्व देशासोबत'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

खेळ आणि एकात्मता यावर विश्वास आहे, पण सध्याच्या नाजूक परिस्थितीत देशासोबत उभे राहणे अधिक महत्त्वपूर्ण आहे. सध्याच्या घडीला देशाच्या संरक्षणासाठी सर्वात पुढे असलेल्या सशस्त्र सेना दलाचा विचार महत्त्वाचा आहे. आम्ही सर्व ताकदीनिशी देशासोबत आहोत. जय हिंद, असे भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याने म्हटले आहे.

भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आयपीएलसह देशात पहिल्यांदा आयोजित करण्यात येणारी 'एनसी क्लासिक' ही भालाफेक क्रीडा स्पर्धा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. २४मे पासून ही स्पर्धा खेळवण्यात येणार होती. भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा याने ही स्पर्धा स्थगित करण्यात आल्याची माहिती देताना एक खास संदेशही दिला आहे. सध्याच्या परिस्थितीत आम्ही संपूर्ण ताकदीनिशी भारतीय सैन्यासोबत आहोत, असा उल्लेख त्याने शेअर केलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com